CMYK

## आयटीआय पोलीस चौकीजवळ चाकूने मारहाण

**सोलापूर** : रस्त्यावर महिलेसोबत बोलत असताना अचानक पाठीमागून आलेल्या अनोळखी इसमांनी चाकू ,फायटर आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून एका तरुणास जखमी केले . ही घटना विजापूर रोडवरील आयटीआय पोलीस चौकि जवळ शनिवारी रात्रीच्या सुमारास घडली. समीर जाकिरहुसेन पिरजादे (वय ३० रा. तेलंगी पाच्छापेठ) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. त्याला उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल करण्यात आले. पिरजादे हा काल रात्री इंदिरानगर कडे जाणाऱ्या रस्त्यावर त्याच्या आत्याशी बोलत थांबला होता. त्यावेळी अनोळखी तरुणाने त्याला मारहाण केली. अशी नोंद विजापूर नाका पोलीसात झाली आहे.

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. १९ जून २०२३ | ▸ वर्ष : २१ वे ▸ अंक : २६० वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## एमपीएलमध्ये सोलापूरचा ७९ धावांत खुर्दा

**सोलापूर** : महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या(एमसीए) वतीने आयोजित महाराष्ट्र प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत नाशिकच्या भेदक गोलंदाजीपुढे सोलापूरचा ७९ धावांत खुर्दा उडाला. नाशिकने दिलेल्या १६१ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना सोलापूरचा संघ ७९ धावांपर्यंत मजल मारु शकला. नाशिकने हा सामना ८२ धावांच्या फरकाने जिंकला. धनराज शिंदेची उपयुक्त नाबाद ४२ धावांची खेळी, तर प्रशांत सोळंकी (३-१२), अक्षय काळोखे (२-२६) यांनी केलेल्या भेदक गोलंदाजीच्या जोरावर ईगल नाशिक टायटन्स संघाने सोलापूर रॉयल्स संघावर ८२ धावांनी विजय मिळवत आपली विजयी मालिका कायम ठेवली.

# काळे आणि बागलांनी उधळला 'गुलाल'

## 'शिरोमणी'त अभिजीत पाटलांच्या पॅनलचा दारुण पराभव, करमाळ्यात एकतर्फी निवडणूक

**सुराज्य/पंढरपूर**

**पंढरपूर तालुक्याचेच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यातील साखर सम्राटांचे लक्ष लागलेल्या भाळवणी येथील सहकार शिरोमणी वसंतराव काळे सहकारी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये अखेर सत्ताधारी कल्याणराव काळे यांच्या गटाने विजयाचा गुलाल उधळला. तर दुसरीकडे करमाळा तालुक्यातील मकाई साखर कारखान्यावर बागल गटाने आपले अधिराज्य गाजवले. काळे यांच्या उमेदवारांनी पंधराशेहून अधिक मतांनी विजय मिळवताच अत्यंत उत्साही झालेल्या त्यांच्या कार्यकर्त्यांनी मोठा जल्लोष केला. कार्यकर्त्यांच्या या उत्साहामुळे काहीवेळा पोलिसांना लाठीमार देखील करावा लागला.**

तालुक्यातील भाळवणी येथील सहकार शिरोमणी साखर कारखान्याच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये सत्ताधारी काळे यांच्या विरोधात विठ्ठल कारखान्याचे अध्यक्ष व साखर सम्राट अभिजीत पाटील, सहकार शिरोमणीचे माजी संचालक दीपक पवार व स्वेरीचे संस्थापक सचिव डॉ. बी. पी.रोंगे यांनी दंड थोपटले होते. काळे यांच्यासाठी ही अस्तित्वाची लढाई असल्याने त्यांनी विठ्ठलचे माजी अध्यक्ष भगीरथ भालके यांच्यासह युवराज पाटील, गणेश पाटील यांच्याशी हातमिळवणी केली होती. यासह ठाकरे गटाच्या शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी देखील काळे यांना पाठींबा दिला होता. यामुळे ही निवडणूक अत्यंत चुरशीने झाली. मागील पंधरा दिवसापासून दोन्ही गटाकडून एकमेकांवर मोठे आरोप-प्रत्यारोप झाले. अनेकदा प्रचाराची पातळी देखील घसरली. कारखान्याची निवडणूक असून देखील याचा प्रचार विधानसभेची रंगीत तालीम म्हणूनच सुरू होती.



### सहा महिन्यापूर्वीची सत्तेची घमेंड उतरली : काळे

विजयानंतर बोलताना कल्याणराव काळे यांनी सहकारामध्ये काही अपप्रवृत्ती शिरल्या असल्याची टीका केली. सहा महिन्यापूर्वी कारखान्याच्या निवडणुकीमध्ये विजय मिळवल्यामुळे हे दंड फुगवून फिरत आहेत. परंतु सभासदांनी त्यांचा माज उतरवला. विरोधकांनी पैश्याचा पाऊस पाडला, दमदाटी केली परंतु सभासदांनी बावीस वर्षापासून असणारा विश्वास कायम ठेवला. या निवडणुकीत भगीरथ भालके, युवराज पाटील, गणेश पाटील देखील बरोबर होते. यामुळे खरा विठ्ठल परिवार देखील कोण आहे, हे हुशारकी मारणाऱ्यांना कळले असल्याचा टोला लगावला. तसेच आगामी लोकसभा, विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती व नगरपरिषद आदी सर्व निवडणुका आम्ही विठ्ठल परिवार म्हणून एकत्रच लढणार असल्याचे काळे यांनी जाहीर केले.

### कार्यकर्त्यांची हुल्लडबाजी, पाटलांची गाडी फोडली, पोलिसांचा लाठीचार्ज

सकाळी मतमोजणी सुरू झाल्यानंतर अभिजीत पाटील यांनी या ठिकाणी हजेरी लावली. परंतु काही तासातच काळे यांच्या गटाने विजयी आघाडी घेतल्यामुळे ते शासकीय गोदामा बाहेर पडले. यावेळी बाहेर लावलेल्या त्यांच्या गाडीची काच दगड मारून काही कार्यकर्त्यांनी फोडली. तसेच पोलीस बंदोबस्तामध्ये बाहेर पडलेल्या अभिजीत पाटील यांच्या अंगावर देखील काही कार्यकर्ते धावून गेले. त्यांच्या गाडीचा पाठलाग करून गुलाल उधळण्यात आला. तर मतमोजणी झाल्यानंतर दीपक पवार, डॉ. बी. पी.रोंगे बाहेर पडत असताना देखील उत्साही कार्यकर्त्यांनी त्यांना पाहून मोठा गोंधळ घालण्यास सुरूवात केली.

### विजयी उमेदवार आणि पडलेली मते

| | |
|---|---|
| जाधव गोरख हरीबा | ५५६९ |
| दगडे युवराज छगन | ५४९१ |
| सराटे सुनिल वामन | ५४५६ |
| काळे कल्याणराव वसंतराव | ५६२७ |
| माने अमोल नवनाथ | ५४६० |
| लामकाने परमेश्वर हरिदास | ५४४१ |
| कदम दिनकर नारायण | ५५४४ |
| फाटे नागेश एकनाथ | ५५०७ |
| नागटिळक मोहन वसंतराव | ५४७५ |
| ताड योगेश दगडू | ५४९५ |
| देशमुख जयसिंह बाळासाहेब | ५४३६ |
| सरदार तानाजीराव उमराव | ५४१६ |
| पाटील राजाराम खासेराव | ५४९४ |
| शिंदे आण्णा गोरख | ५४७६ |
| भोसले संतोषकुमार शिवाजी | ५४५३ |
| शिंदे राजेंद्र भगवान | ५५६८ |
| देठे संगीता सुरेश | ५५२१ |
| माने उषाताई राजाराम | ५३८३ |
| नलवडे अरूण नामदेव | ५५४३ |
| कोळेकर भारत सोपान | ५६६१ |



## मकाईवर बागल गटाचेच राज्य

**सुराज्य/करमाळा**

करमाळा तालुक्याचे लक्ष लागलेल्या मकाई सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीचा निकाल जाहीर झाला. या निवडणुकित बागल कुटुंबियांचा एकही अर्ज नसतानाही बागल गटाने विक्रमी मतदान मिळवून मकाईचा गड शाबूत राखण्यात सहजगत्या यश मिळवले आहे. सतरा जागांसाठी झालेल्या या निवडणुकित बागल गटाच्या ८ जागा यापूर्वीच बिनविरोध झाल्या होत्या. यात ऊस उत्पादक चिकलठाण गटामधून सतीश नीळ, दिनकर सरडे, तसेच ऊस उत्पादक वांगी गटामधून सचिन पिसाळ व युवराज नाना रोकडे तर संस्था प्रतिनिधी गटामधून नवनाथ बागल याशिवाय अनुसूचित जाती गटामधून कोर्टीचे आशिष गायकवाड तर अनुसूचित जमाती मधून बापू चोरमुले याशिवाय इतर मागासवर्गीय गटामधून अनिल अनारसे हे यापूर्वीच बागल गटाचे उमेदवार बिनविरोध निवडून आले आहेत. इतर ९ जागांसाठी ही निवडणूक झाली होती. लोकनेते दिगंबरराव पॅनलने याही जागांवर विजय मिळविला आहे. करमाळा शहरातील यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या बहुउद्देशीय सभागृहात रविवारी ही मतमोजणी शांततेत पार पडली. तुल्यबळ विरोधक नसल्याने मोजणी वेळी बागल गटाची सुरवातीपासूनच सरशी होती. प्राध्यापक रामदास झोळ यांच्या मकाई परिवर्तन पॅनल मधील पराभूत उमेदवाराची नावे व मते पुढील प्रमाणे महिला राखीव गट सुनिता गिरंजे १४३५ ऊस उत्पादक मांगी गट सुभाष शिंदे १४ ६५ ऊस उत्पादक भिलारवाडी गट सुनिता गिरंजे १३२८ आप्पा जाधव ऊस उत्पादक पारेवाडी गट गणेश चौधरी १५४६ अशा पद्धतीने मते मिळाली आहेत.

### विजयी उमेदवार याप्रमाणे...

महिला राखीव गट करगळ– ८२५१ मते, अश्विनी झोळ ८२३२, ऊस उत्पादक मांगी गट– दिनेश भांडवलकर ८२५६, अमोल यादव ८१६६, ऊस उत्पादक भिलारवाडी गट– अजित झांजुर्णे– ८२६७, रामचंद्र हाके– ८१२९, ऊस उत्पादक पारेवाडी गट– रेवननाथ निकत ८३९०, संतोष पाटील ८३८३, उत्तम पांढरे ८०९४. बिनविरोध उमेदवार याप्रमाणे... ऊस उत्पादक चिकलठाण गट– सतीश नीळ, दिनकर सरडे, ऊस उत्पादक वांगी गट– सचिन पिसाळ व युवराज नाना रोकडे, संस्था प्रतिनिधी गट– नवनाथ बागल, अनुसूचित जाती गट– कोर्टीचे आशिष गायकवाड, अनुसूचित जमाती गट– बापू चोरमुले, इतर मागासवर्गीय गट– अनिल अनारसे. (सर्व बागल गट)

## सुपली येथे घरपोडी; ३ लाखांचे दागिने लंपास

**सोलापूर** : सुपली (ता.पंढरपूर) येथे उघड्या घरात प्रवेश करून चोरट्याने कपाटातील ७० ग्रॅम सोन्याचे दागिने पळविले. ही चोरी शनिवारी पहाटेच्या सुमारास घडली. यासंदर्भात धनंजय दत्तात्रय यलमार (रा. सुपली ता.पंढरपूर) यांनी पंढरपूर ग्रामीण पोलिसात दाखल केली. ते शुक्रवारी रात्री घराचा दरवाजा उघडा ठेवून झोपले होते.

पहाटे दोन वाजेच्या दरम्यान चोरट्याने उघड्या घरातून प्रवेश करून लोखंडी पेटी आणि कपाटाचे कुलूप तोडून २ लाख ८० हजार रुपये किमतीचे दागिने पळून नेले, असे त्यांच्या फिर्यादीत नमूद आहे. या प्रकरणात पोलिसांनी अनोळखी चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. सहाय्यक फौजदार दिवसे पुढील तपास करीत आहेत.

## मंत्री संजय राठोड यांच्या विशेष विमानाचा सोलापूर विमानतळावरुन 'टेक-ऑफ'!

**सुराज्य/सोलापूर**



सोलापुरातील होटगी रोडवरील विमानतळासाठी श्री सिध्देश्वर साखर कारखान्याची ९२ मीटर उंचीची चिमणी १५ जूनला जमीनदोस्त होऊन अवघे दोनच दिवस झाले असताना आणि प्रवाशी विमान उड्डाणासाठी किमान तीन महिन्याचा कालावधी लागणार असताना युतीतील शिंदे गटाचे मंत्री संजय राठोड यांचे विशेष विमान मात्र आज रविवारी दुपारी येथील टेक-ऑफ झाले. यामुळे सोलापूर होटगी रोड विमानतळावरुन विमान उडण्यास परवानगी मिळाली की काय?, अशी चर्चा सुरु झाली आहे.

आज रविवारी दुपारी मंत्री संजय राठोड हे तीन जिल्ह्याचा दौरा करुन खासगी वाहनाने सोलापूर विमानतळावर आले. त्यांच्यासाठी विमानतळावर विशेष विमान तैनात होते. राठोड हे विमानतळावर येताच त्यांचे सोलापुरातील समर्थक कार्यकर्ते तसेच पोलीस प्रशासन आणि विमानतळ प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी अत्यंत उत्साहात स्वागत केले. या स्वागतानंतर राठोड विमानात बसताच विमानाने टेकॅ-ऑफ घेतला. गेल्या अनेक वर्षापासून सोलापूर होटगी रोड विमानतळावरुन विमानाने उड्डाण केले नाही. मंत्री राठोड यांच्या विशेष विमानाने मात्र अडथळा ठरणारी कारखान्यांची 'चिमणी' जमीनदोस्त झाल्यावर उड्डाण घेतले. यावरुन नागरिकांची विमानतळावरुन विमानसेवा सुरु झाली की काय?, अशीच चर्चा सुरु झाली.

## अभिनेते पूजापुरा रवी यांचे निधन



**मुंबई** : मल्याळी फिल्म इंडस्ट्रीतले ज्येष्ठ अभिनेते पूजापुरा रवी यांचं आज निधन झालं. ते ८६ वर्षांचे होते. अभिनेत्याच्या निधानाने चाहत्यांना धक्का बसला आहे. तर सिनेसृष्टीवरही शोककळा पसरली आहे. गेल्यावर्षी डिसेंबर महिन्यात पूजापुरा हे तिरुवनंतपुरमहून इडुक्कीतल्या घरी स्थायिक झाले होते. काही महिन्यांपासून त्यांची प्रकृती बरी नव्हती. वृद्धापकाळानं त्यांचे निधन झाले.पूजापुरा यांच्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. पूजापुरा रवी यांनी ८०० पेक्षा जास्त चित्रटात काम केलं होतं. 'गप्पी' हा त्यांचा शेवटचा चित्रपट होता. पूजापुरा यांनी त्यांच्या करिअरची सुरुवात दिवंगत एन.के. आचार्य यांच्या कलानिलयम या नाटक कंपनीतून केली होती.

## शॉक बसल्याने पालिका कर्मचाऱ्याचा मृत्यू



**सुराज्य/सोलापूर**

घराजवळ अंघोळ करून कपडे धूत असताना विजेच्या शॉक बसल्याने ५७ वर्षीय पालिका कर्मचारी मयत झाले . ही दुर्घटना भवानी पेठ येथील हनुमान मंदिराजवळ रविवारी दुपारच्या सुमारास घडली .

खाजप्पा पांडुरंग गजधाने (वय ५७ रा. भवानी पेठ चमडा कारखान्याजवळ) असे मयताचे नाव आहे. ते आज दुपारी दोन वाजेच्या सुमारास घराच्या बाजूस अंघोळ करून कपडे धुवत होते. त्यावेळी छतावरील पत्र्याला हाताचा स्पर्श लागल्याने त्यांना शॉक बसून ते बेशुद्ध पडले. त्यांना शासकिय रुग्णालयात दाखल केले असता ते उपचारापूर्वी मयत झाले.

मयत खाजप्पा गजधाने हे पालिकेतील आरोग्य विभागात कामास होते . त्यांच्या पश्चात २ मुले आणि २ मुली असा परिवार आहे. त्यांच्या घरात विजेचे कनेक्शन नाही. त्यांच्या घरावरून गेलेल्या विद्युत वाहिनीतून हा प्रकार घडला.

## आदिपुरुष चित्रपट बदलण्यात येणार, निर्माते आणि दिग्दर्शकाचा निर्णय

**सुराज्य/सोलापूर**



बहुचर्चित आदिपुरुष या चित्रपटावर प्रेक्षकांनी जोरदार टीका केली. या चित्रपटामधील भाषा ही अत्यंत छपरी असल्याची टीका चित्रपट पाहून आलेल्या प्रेक्षकांनी केली आहे.बहुचर्चित आदिपुरुष या चित्रपटावर प्रेक्षकांनी जोरदार टीका केली.

या चित्रपटामधील भाषा ही अत्यंत छपरी असल्याची टीका चित्रपट पाहून आलेल्या प्रेक्षकांनी केली आहे. 'आदिपुरुष' हा चित्रपट पाहिल्यानंतर रामायण कसं दाखवू नये याचं उदाहरण सादर केल्याची टीका अनेकांनी सोशल मीडियावर करायला सुरुवात केली. एवढेच नाही तर या चित्रपटामधील व्हिएफएक्स, रावण, प्रभू राम आणि हनुमान यांच्या वेशभूषेची खिल्ली उडवण्यात आली आहे. चित्रपटामधील कलाकारांच्या डायलॉगमुळे निर्माते-दिग्दर्शक आणि लेखकाला प्रचंड ट्रोल केलं जात आहे. या ट्रोलिंगनंतर अखेर त्यातील काही डायलॉग्स बदलणार असल्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सोशल मीडियावरील प्रचंड ट्रोलिंगनंतर अखेर या चित्रपटाच्या निर्माते आणि दिग्दर्शकांनी मोठा निर्णय घेतला आहे. या चित्रपटातील वादग्रस्त डायलॉग्स बदलण्यात येणार असल्याची माहिती समोर येत आहे. टी-सीरिजच्या अधिकृत प्रवक्त्याने याबाबतची माहिती दिली आहे. त्याचसोबत संवादलेखक मनोज मुंतशीर यांनीदेखील ट्विट करत डायलॉग्स बदलणार असल्याचं स्पष्ट केलं आहे. मनोज मुंतशीर यांनी ट्विटमध्ये लिहिले आहे की, 'मी आणि चित्रपटाचे निर्माते-दिग्दर्शकांनी ठरवलंय की जे संवाद तुम्हाला खटकले आहेत, त्याविषयी आम्ही अभ्यास करू आणि या आठवड्यात सुधारित संवाद चित्रपटात समाविष्ट करू', असं त्यांनी म्हटलंय. मात्र याच ट्विटमध्ये त्यांनी टीकाकारांवर नाराजी व्यक्त केली आहे.

## पर्यटनाचे पॅकेज देतो म्हणून फसवणूक

**सुराज्य/सोलापूर**

वर्षभरात कुठेही फिरा असे म्हणून पर्यटनाचे पॅकेज देतो असे सांगून सहाजणांच्या एका कंपनीने ८० हजार रूपयाला फसवल्याचे उघड झाले.

विरेश शिवलिंगप्पा अंगडी (वय ४९, रा. ७८९ उत्तर कसबा कुंभार वाडा सोलापूर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून मुंबई येथील गुडवन हॉस्पिटॅलीटी प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचे अमित यादव, करण काळे, प्रेम, आर्यन व इतर दोघेजण असे सहाजणांनी मिळून भारतात दरवर्षी कुठेही फिरा दरमहिन्याला ठराविक रक्कम भरा आणि पर्यटन करा अशी योजना काढली होती त्या योजनेत दरमहा २ हजार रूपये भरण्याचा करार कंपनीच्या वतीने आरोपींनी करून घेतला.

परंतु अचानकपणे त्यांनी दरमहिन्याला खात्यामधून अधिकची रक्कम म्हणजे एकूण ८० हजार रूपये काढून घेतले आणि कराराचा भंग करीत पर्यटन केलेच नाही त्यावरून गुडवन कंपनीचे वरील सहाजणांनी फसवणुक केली अशी नोंद सदर बझार पोलीस ठाण्यात झाली असून पुढील तपास पोलीस नाईक माडे करीत आहेत.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




तुला तर माहिती आहे, की मी किती बिझी असतो!

## पाऊस लांबल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेवर मंदिचे ढग

**सुराज्य/सोलापूर**

शेतीसाठी महत्त्वाचा असलेला नैऋत्य मोसमी पाऊस लांबला आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, उत्तर भारतात मान्सूनचे आगमन होण्यास अद्याप आठवडाभराचा उशीर होऊ शकतो. मात्र, भारतीय हवामान खात्याचा अंदाज आहे की यावर्षी मान्सूनचा पाऊस सामान्य असणार आहे. मान्सून हा भारतीय ग्रामीण अर्थव्यवस्थेत आणि शेतीमध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जर मान्सून चांगला असेल तर पिकाचे उत्पादन चांगले आले असते. मात्र पाऊस लांबल्याने ग्रामीण अर्थव्यवस्थेवर मंदिचे ढग दाटले आहे.

हवामान खात्याने जूनच्या सुरुवातीला चार महिन्यांच्या मान्सूनचा अंदाज जारी केला होता. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, या हंगामात जून ते सप्टेंबर या कालावधीत मान्सूनची दीर्घकालीन सरासरी ९६ ते १०४ टक्के असू शकते. हे प्रमाण सामान्य मान्सूनचे लक्षण आहे. मान्सूनचा पाऊस हा भारतीय अर्थव्यवस्थेसाठी खूप महत्त्वाचा आहे, देशाच्या अर्ध्याहून अधिक शेतीयोग्य जमिनीचे सिंचन यावर अवलंबून आहे. अशा प्रकारे मान्सूनचा थेट संबंध खाद्यपदार्थांच्या भाववाढीशी असतो.

सध्या मान्सून लांबल्याने खरीप पिकांच्या पेरण्या उशिराने सुरू झाल्या आहेत. मान्सूनचा पाऊस अपेक्षेपेक्षा चांगला झाला नाही, तर खरीप पिकांचे उत्पन्न कमी राहू शकते. त्यामुळे आगामी काळात खाद्यपदार्थांच्या किमती वाढू शकतात. अशा स्थितीत महागाईच्या आघाडीवर काही महिन्यांपासून सातत्याने दिलासा मिळत असल्याने होणारा फायदा नागरिकांना मिळणार नाही. रिझर्व्ह बँकेनेदेखील याबाबतची भीती व्यक्त केली आहे. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी या महिन्यात झालेल्या एमपीसीच्या बैठकीनंतर, एल निनोमुळे आगामी काळात महागाईच्या आघाडीवर धोका निर्माण होऊ शकतो, अशी भीती वर्तवली होती. मागील काही महिन्यांपासून महागाई दर नियंत्रणात असल्याने रेपो दर स्थिर आहे. महागाई दर कमी राहिल्यास रेपो दरातही घट होण्याची शक्यता आहे. महागाई दर वाढल्यास कर्जाचे हप्ते महाग राहण्याची भीती आहे.



### मान्सूनचा परिणाम?

मान्सूनच्या पावसाचा संबंध हा ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेवर अधिक परिणाम करणारा आहे. मान्सूनचा मोसम वाईट गेल्यास ग्रामीण भागातील मागणीत घट होते. याचा परिणाम अनेक क्षेत्रावर होतो. यात मुख्यत: उपभोग आधारीत क्षेत्रावर अधिक होतो. उपभोग क्षेत्रात खाद्यान्न, कपडे, वाहन, इलेक्ट्रॉनिक्स आणि उपकरणे आदींचा क्षेत्राचा समावेश होतो.

CMYK

# नव्या नियमांचा बडगा

राज्य सरकारने सहकार क्षेत्राविषयी एक नवा अध्यादेश काढल्यामुळे शिंदे-भाजपा सरकार आणि सहकार क्षेत्रात प्रबळ असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस यांच्या राजकीय जुगलबंदी रंगणार असे दिसते. महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस यांनी दि. ७ जून रोजी 'महाराष्ट्र सहकारी संस्था कायदा, १९६०' या कायद्यात महाराष्ट्र सरकारने केलेल्या सुधारणेला मान्यता दिली. यानुसार आता निष्क्रिय सदस्यांना मतदानाचा अधिकार राहणार नाही. या अध्यादेशानुसार, जे सदस्य एकाही वार्षिक सर्वसाधारण सभेला हजेरी लावली नाही किंवा सलग पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत सोसायटी आणि समितीच्या सेवांचा लाभ घेतला नाही, असे सदस्य निष्क्रिय सदस्य मानले जातील. या अध्यादेशाला सहकारी गृहनिर्माण संस्था आणि नागरी सहकारी बँकांनी फारसा विरोध केलेला नाही. मात्र, महाराष्ट्र फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज लिमिटेडने मात्र कायद्यातील सुधारणेवर तीव्र आक्षेप घेतला आहे. कायद्यात सुधारणा करण्यासाठी काढलेल्या अध्यादेशानुसार सहकारी संस्थेतील सक्रिय आणि निष्क्रिय सदस्यांमधील फरक स्पष्ट करण्यात आला आहे. कायद्यातील सुधारणेनुसार, सोसायटीच्या कामात सहभाग घेणारा आणि सोसायटीने देऊ केलेल्या किमान सेवा किंवा उत्पादनांचा लाभ घेणारा सदस्य हा सक्रिय सदस्य असेल. साखर कारखान्यांच्या बाबतीत बोलायचे झाल्यास, ज्या शेतकऱ्यांनी आपला ऊस कारखान्याला विकला आहे. तसेच ज्या सभासदांनी बँकेच्या व्यवहारात सहभाग घेतला असेल, असे सदस्य नागरी सहकारी बँकेचे सदस्य असतील. नव्या सुधारणेनुसार, ज्या सदस्यांनी एकाही वार्षिक सर्वसाधारण बैठकीला हजेरी लावलेली नाही किंवा सलग वर्षांत एकदाही सोसायटीच्या सेवांचा वापर केला नाही, अशा सदस्यांना निष्क्रिय सदस्य मानून त्यांची सदस्यता रद्द केली जाईल. अशा सदस्यांना सोसायटीच्या किंवा समितीच्या पदाधिकाऱ्यांच्या निवडणुकीत मतदान करता येणार नाही किंवा स्वतःलाही निवडणुकीत उभे राहता येणार नाही. सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत बोलायचे झाल्यास या सुधारणेमुळे ज्या सदस्यांनी आपला ऊस कारखान्याला विकला नाही किंवा सलग पाच वर्षांत एकही वार्षिक सर्वसाधारण सभेला हजेरी लावली नाही, अशा सदस्यांची सदस्यता रद्द करण्यात येईल. महाराष्ट्र सहकारी साखर कारखाना महासंघाचे माजी अध्यक्ष आणि संचालक जयप्रकाश दांडेगावकर यांनी ९ जून रोजी पत्र लिहून या सुधारणेबाबत तीव्र आक्षेप नोंदविला. दांडेगावकर हे हिंगोली जिल्ह्यातील पूर्णा सहकारी साखर कारखाना चालवितात. दांडेगावकर यांच्या मते, राज्य सरकारचे हे प्रतिगामी पाऊल असून लोकशाही प्रणालीच्या व्यवस्थेला यामुळे धक्का पोहोचणार आहे. सहकारी संस्था या मूलभूत आणि तळागाळात कार्यरत असलेल्या लोकशाही संस्था आहेत. सदस्यत्व रद्द करणे किंवा मतदानाचा अधिकार काढून घेतल्यामुळे अशा संस्थांवर एकप्रकारे हल्ला करण्यासारखे आहे, असे ते म्हणतात. सर्व कारखान्यांनी या सुधारणेला विरोध केलेला नाही. विशेषतः महाराष्ट्राच्या सीमाक्षेत्रातील कारखान्यांनी. सांगली आणि कोल्हापूर या दोन्ही जिल्ह्यातील सहकारी आणि खासगी साखर कारखान्यांनी कर्नाटकातील साखर कारखान्यांची तक्रार केली आहे. कर्नाटकमधील साखर कारखाने सीमाभागातील शेतकऱ्यांच्या उसाची पळवापळवी करतात. राज्याच्या सीमाभागातील काही तालुक्यामधील शेतकरी उसाचा भाव बघून दोन्हीकडील कारखान्यांना आपला ऊस विकतात. यामुळे शेतकऱ्यांच्या उसाला चांगला दर मिळत असला तरी राज्यातील कारखान्यांचे नुकसान होते. सहकारी साखर कारखान्यांच्या घटनेनुसार कारखान्याला ऊस पुरविण्याची अट घालण्यात आली आहे. तरीही अतिशय कमी साखर कारखाने थकबाकीदारांवर कारवाई करतात. यामागे अनेकदा राजकीय कारणे असल्याचे बोलले जाते. नियमावली चांगली असली तर त्यातून साखर कारखानदारीत सुडाचे राजकारण पेटेल, अशी भीती व्यक्ती केली जातेय.



## राजकीय

# लक्ष्मणरेषा...

**ठाकरे सरकारला सत्तेवरून हटवून शिंदे-फडणवीस यांचे सरकार येऊन येत्या ३० जून रोजी एक वर्षे होईल. सरकारमध्ये केवळ १८ मंत्री आहेत. वर्ष झाले तरी विस्तार होत नाही, महामंडळाच्या नेमणुका नाहीत. महापालिका निवडणुका कधी होणार? हे कोणी सांगू शकत नाही. २०२४च्या लोकसभेची तयारी मात्र जोरात सुरू आहे.**



राष्ट्रामध्ये मोदी आणि महाराष्ट्रात शिंदे' अशी जाहिरात १३ जून २०२३ च्या मुंबईतील काही वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाली आणि राजकारणातील अनेकांच्या हृदयाचे ठोके चुकले. एका सर्व्हेची आकडेवारी या जाहिरातीत प्रसिद्ध करण्यात आली होती. महाराष्ट्रात भाजप-शिवसेना (शिंदे) युती महाविकास आघाडीपेक्षा लोकांना कशी अधिक पसंत आहे हे ठसविण्यात आले. तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापेक्षा कसे जास्त लोकप्रिय आहेत, हेही केलेल्या सर्व्हेतील टक्केवारीतून दाखविण्यात आले. मग प्रश्न असा पडतो की, भाजप-शिवसेना युती ही महाआघाडीपेक्षा लोकप्रिय आहे, हे दाखविण्यासाठी ही जाहिरात होती की, शिंदे हे फडणवीसांपेक्षा जास्त सरस आहेत याचे प्रदर्शन करण्याचा हा प्रयत्न होता? या जाहिरातीने राजकारणाचा माहोलच बदलून गेला. भाजप-शिवसेना युतीला तडे गेले इथपासून शिंदे-फडणवीस यांच्यात कुरघोडीचे राजकारण सुरू झाले, इथपर्यंत अशा असंख्य आरोप-प्रत्यारोपांनी महाआघाडीच्या नेत्यांनी भरपूर तोंडसुख घेतले. मी असे बोललोच नाही किंवा आमच्या वक्तव्याचा चुकीचा अर्थ काढला गेला, असा खुलासा करण्यास शिवसेना शिंदे गटाला वावच नव्हता. जे काही प्रसिद्ध झाले, ते डझनभर वृत्तपत्रांच्या पहिल्या पानावरील रंगीत जाहिरातीत स्पष्ट होते.

शिवसेना व एकनाथ शिंदेंचे ब्रँडिंग आणि मार्केटिंग करणाऱ्या या जाहिरातीनंतर भाजपमधून झणझणीत प्रतिक्रिया उमटल्याच. पण काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस व उबाठा सेनेलाही वाहत्या गंगेत हात धुवून घेण्याची आयती संधी मिळाली. दुसऱ्या दिवशी मात्र त्याच वृत्तपत्रांत दुसरी पानभर रंगीत जाहिरात प्रसिद्ध झाली आणि डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न झाला. पहिल्या जाहिरातीत पंतप्रधान नरेंद्र मोदी व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे एकमेकांकडे बघतानाचे मोठे हसरे फोटो होते. दुसऱ्या दिवशीच्या जाहिरातीत मोदींबरोबर अमित शहा एका बाजूला, मध्यभागी कमळ व धनुष्यबाण आणि शेजारी धर्मवीर आनंद दिघे व शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचे फोटो झळकले. दुसऱ्या जाहिरातीत शिंदे व फडणवीस यांचे हात उंचावलेले जोडीचे फोटो बघायला मिळाले. दुसऱ्या जाहिरातीत शिवसेनेच्या नऊ मंत्र्यांचेही फोटो प्रसिद्ध झाले. जनतेच्या चरणी माथा, गर्जा महाराष्ट्र माझा', अशा लक्ष वेधून घेणाऱ्या ओळीही होत्या. 'पहिल्या जाहिरातीत फडणवीसांचा फोटो नाही, उल्लेख नाही. शिंदे यांना मुख्यमंत्री म्हणून २६ टक्के, तर फडणवीसांना २३ टक्के लोकांची पसंती आहे, असे दाखवून शिंदे हेच वरचढ' असे सांगणारी पहिली जाहिरात होती. 'मी पुन्हा येईन' किंवा 'देशात नरेंद्र व राज्यात देवेंद्र' या घोषणेला छेद देणारी पहिली जाहिरात होती.

केवळ शिवसेनेचा बेंजो वाजविणाऱ्या जाहिरातीनंतर फडणवीस मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर पत्रकारांशी न बोलताच मोटारीत बसून निघून गेले. दुसऱ्या दिवशी शिंदेंबरोबरच्या 'शासन आपल्या दारी' या कोल्हापूरच्या कार्यक्रमालाही ते गेले नाही. आपला कान दुखतोय सांगून मुंबईतील कार्यक्रमालाही ते गैरहजर राहिले. शिंदे व फडणवीसांमध्ये काही तरी बिघडले आहे, या चर्चेला उधाण आले, ते दोन्ही पक्षांच्या नेत्यांनी व पदाधिकाऱ्यांनी केलेल्या वेगवेगळ्या शेरेबाजीमुळे. प्रवीण दरेकरांनी नाराजी व्यक्त करताना म्हटले, 'प्रत्येकाला आपला पक्ष मोठा करण्याचा हक्क आहे, पण दुसऱ्याला कमी लेखून नाही.'

जाहिरात वादानंतर दोन दिवसांनी शिंदे व फडणवीस हे दोघेही पालघरच्या कार्यक्रमात एकाच व्यासपीठावर दिसले. एकाच हेलिकॉप्टरने पालघरला गेले. पण धावपट्टीवरून ते दोघे वेगवेगळ्या मोटारींने कार्यक्रमाच्या ठिकाणी रवाना झाले, याचीच चर्चा अधिक झाली. कार्यक्रमात बोलताना शिंदे म्हणाले, 'आम्ही दोघे हेलिकॉप्टरने आलो तेव्हा, एका पत्रकाराने विचारले, तुम्ही दोघांनी एकत्र प्रवास केलात, कसं वाटत आहे? मी म्हटले, आमचा प्रवास २५ वर्षांपासून एकत्र चालू आहे. गेल्या वर्षभरात तो अधिक घट्ट झाला. आमच्या प्रवासाची चिंता कुणी करण्याची गरज नाही. आम्ही खुर्च्या तोडण्यासाठी किंवा केवळ सत्ता मिळविण्यासाठी सरकारमध्ये नाही. सामान्य जनतेच्या जीवनात सामाजिक व आर्थिक परिवर्तन व्हावे यासाठी आम्ही सरकार चालवत आहोत. काही लोक, आम्हाला धरम-वीर, तर काही जय-वीरू म्हणतात. आमच्यात दरी निर्माण होऊ शकत नाही. सरकार एका विचाराचे आहे. पंचवीस वर्षांपासूनची जीवाभावाची मैत्री आहे. 'ये फोव्हिकॉल का जोड हैं, टुटेगा नहीं', असेही शिंदे सांगत आहेत.

देवेंद्र फडणवीस यांनी पालघरच्या कार्यक्रमात एकनाथ शिंदे यांचा 'महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री' असा आदरपूर्वक उल्लेख करताच अनेकांचे डोळे विस्फारले तसेच अनेकांना सुखद धक्काही बसला. फडणवीस यांनीही आपली भूमिका मांडताना म्हटले, एखाद्या जाहिरातीमुळे किंवा एखाद्याच्या वक्तव्यामुळे या सरकारमध्ये काही (बरे-वाईट) होईल, एवढं सरकार तकलादू नाही. हे काही जुनं सरकार नाही, की कुणी आधी भाषणं करायचं, कुणी नंतर, यासाठी एकमेकांची गचांडी पकडणारे आम्ही बघितले आहेत.

वसंतदादा पाटील, शरद पवार, नारायण राणे, विलासराव देशमुख, सुशीलकुमार शिंदे अशा दिग्गज नेत्यांचे पुत्र किंवा कन्या ते मुख्यमंत्रीपदावर असतानाही राजकारणात सक्रिय होते, तेव्हा असा वाद ऐकायला मिळाला नाही. मग आताच एकनाथ शिंदे यांचे पुत्र डॉ. श्रीकांत यांच्याविरोधात मित्रपक्षातील एका गटाकडून का नाराजी व्यक्त होत आहे. आमची मैत्री घट्ट आहे, असे शिंदे यांना सांगावे लागले. हा विश्वास शिवसेना-भाजपच्या कार्यकर्त्यांमध्ये निर्माण होणे महत्त्वाचे आहे. ठाणेच काय कल्याण आणि पालघरही आम्ही लढवणार, असा निर्धार जिल्ह्यातील भाजपच्या कार्यकर्त्यांनी केल्यानंतर धुसफूस प्रकट होऊ लागली. डोंबिवलीमधील भाजपच्या पदाधिकाऱ्यांवर विनयभंगाचा गुन्हा दाखल होतो व त्या पोलीस ठाण्याच्या पोलीस अधिकाऱ्याच्या बदलीच्या मागणीला जोर चढतो, हा शीतसंघर्षातील एक कळीचा मुद्दा ठरला. सरकारमध्ये शिंदे शिवसेनेचे ९ मंत्री आहेत, पैकी ५ मंत्र्यांना हटवावे, अशी सूचना भाजप श्रेष्ठींनी केली, अशा बातम्या वायुवेगाने पसरल्याने शिंदे गटात अस्वस्थता पसरली. जर अमित शहा, शिंदे व फडणवीस या तिघांमध्येच बैठक झाली असेल, तर त्यातील चर्चेची माहिती मीडियाला कळली कशी? ५ मंत्र्यांना हटवावे, अशी श्रेष्ठींनी सूचना केली आहे, यात तथ्य किती?

जाहिरातीनंतर बेडूक कितीही फुगला तरी हत्ती होऊ शकत नाही, अशी टीका भाजपच्या मुख्य प्रवक्त्यांनी केली. तुम्ही खोडी काढली, तर आम्ही गप्प बसणार नाही, हाच त्यातून इशारा होता. मुंबईत मंत्रालयापासून ते विमानतळापर्यंत अटलबिहारी वाजपेयी यांच्या कवितेचे बॅनर्स झळकत होते.

**सबल भुजाओं मे रक्षित हैं । नौका की पतधार,**
**चीर चले सागर की छाती । पार करे मजधार...**


**- डॉ. सुकृत खांडेकर.**

## टुडेज् ब्लॉग

# ऑयलरचे अनुमान खोटे ठरविणारे

**डॉ. राज चंद्र बोस तथा आर. सी. बोस हे अमेरिकेत काम करणारे भारतीय गणितज्ञ आणि सांख्यिकीशास्त्रज्ञ होते. डिझाईन थिअरी, मर्यादित भूमिती आणि एरर-करेक्टिंग कोडच्या सिद्धांतामधील त्यांचे संशोधन कार्य प्रसिद्ध आहे. १७८२ साली लिओनार्द ऑयलर या स्विस गणितज्ञाने काटकोनी लॅटिन चौरसा (ओर्थोगोनल लेटीन स्क्वेअर) विषयी मांडलेले अनुमान रचनात्मक सिद्धतेसह सपशेल खोटे ठरविणाऱ्या त्रिमूर्तीपैकी एक असणारे आर. सी. बोस यांचा १९ जून हा जन्मदिन, त्यानिमित्ताने.**

डॉ. राज चंद्र बोस यांचा जन्म मध्यप्रदेशमधील होशंगाबाद या गावी १९ जून १९०१ रोजी झाला होता. तथापि त्यांचे बालपण हरियाणा राज्यातील रोहतक या शहरात गेले. त्यांचे वडील प्रतापचंद्र बोस यांनी रोहतक शहरात डॉक्टर होण्यापूर्वी ब्रिटिश सैन्यात डॉक्टर म्हणून काम केले होते. राज चंद्र, हे त्यांच्या पालकांच्या चार अपत्यांपैकी सर्वात मोठे. त्यांचे वडील आपल्या ज्येष्ठ मुलासाठी महत्त्वाकांक्षी होते आणि त्यांनी त्याला खूपच प्रोत्साहन दिले होते. पहिल्या क्रमांकाने पास होण्या व्यतिरिक्त इतर कोणतीही गोष्ट नापास मानली जात असे. उदाहरणार्थ, जेव्हा राज चंद्र आठव्या इयत्तेत भूगोल परीक्षेत दुसरे आले तेव्हा त्यांच्या वडिलांनी भूगोलाचे पाठ्यपुस्तक मनापासून शिकण्यास सुचविले, जे त्यांना फारसे कठीण वाटले नाही. कारण त्यांच्याकडे विलक्षण स्मरणशक्ती होती. रोहतकच्या सरकारी हायस्कूलमध्ये शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर, बोस यांनी एप्रिल १९१७ मध्ये दिल्लीतील हिंदू कॉलेजमध्ये प्रवेश केला.



पंजाब विद्यापीठाच्या शिष्यवृत्ती परीक्षेदरम्यान त्यांना इन्फ्लूएन्झा झाल्याने शिष्यवृत्तीसाठी पुरेशी उच्च श्रेणी मिळवण्यात तो अपयशी ठरले. त्यांचे बालपण आणि हिंदू महाविद्यालयात शिकत असतानाचा फलदायी काळ साधारणपणे १९१८ च्या सुमारास त्यांच्या आईचे इन्फ्लूएंझाच्या महामारीत (स्पॅनिश इन्फ्लूएंझा) निधन झाल्याने संपुष्टात आला. आई गमावूनही बोस पंजाब विद्यापीठात १९१९ च्या इंटरमिजिएट परीक्षेत पहिले आले. त्यानंतर दीड वर्षांनी त्यांच्या वडिलांचेही निधन झाल्याने मोठा भाऊ म्हणून सर्व कुटुंबाची जबाबदारी त्यांच्यावर पडली. अर्थातच आता त्यांना शैक्षणिक अभ्यासात कठोर परिश्रम करणे अपेक्षित होते. शिष्यवृत्ती आणि शिकवण्या घेऊन त्यांनी कुटुंबाचा उदरनिर्वाह केला. त्यांच्या सुदैवाने त्यांना सेठ केदारनाथ गोयंका यांच्या लहान भावाची शिकवणी मिळाली. त्यांच्या कामावर खुश होऊन गोयंकांनी त्यांना कोलकाता येथे जेथे त्यांना शुद्ध गणिताचा (प्युअर मॅथेमॅटीक्स) अभ्यास करावयाचा होता तेथे आवश्यक तेवढा काळ पाठिंबा देण्याचे मान्य केले. तेथे त्यांना सुरेख भूमापक प्राध्यापक श्यामप्रसाद मुखर्जी यांचे लक्ष वेधून घेता आले. त्यांचे मुख्यतः गैरयुक्लीडीय भूमिती, न मितीय भूमिती आणि बहिर्वक्राचे सार्वत्रिक गुणधर्म हे आवडीचे विषय होते. त्यांची बोसांवर मर्जी बसली आणि त्यांनी बोसांना राहण्यास खोली, शिकवण्या आणि ग्रंथभांडार वापरायची मुभा दिली. बोसांनी या संधीचा फायदा घेत एम.ए.ला शुद्ध गणितामध्ये पहिल्या वर्गासह प्रथम क्रमांक आणि सुवर्णपदक मिळविले. यामुळे त्यांची मुखर्जी यांच्याकडे गणिती संशोधक म्हणून दोन वर्षांसाठी निवड झाली. अल्पावधीतच त्यांनी बहिर्वक्राच्या विकलक भूमितीवर (डीफ्रेन्शियल जॉमेट्री ऑफ कॉन्वेक्स कर्वज) हा पहिला शोधनिबंध प्रसिद्ध केला. प्रा. महालनोबीस यांच्या वाचनात हा लेख आला आणि त्यांनी बोसांना आयएसआयमध्ये दाखल होण्याची गळ घातली. तेथे त्यांच्या मार्गदर्शनाने बोस संख्याशास्त्रात पारंगत झाले. पुढे त्यांनी सांत क्षेत्र व सांत भूमितीमध्ये सखोल अध्ययन केले.

केनान अध्यासन भूषवून वयाच्या सत्तराव्या वर्षी ते नॉर्थ कॅरोलिना विद्यापीठातून निवृत्त झाले. त्यानंतरही ते विविध ठिकाणी संशोधक-मार्गदर्शक म्हणून कार्यरत राहिले. डॉ. बोस यांना १९७६ साली अमेरिकेचा सर्वोच्च सन्मान म्हणजेच युनायटेड अकादमीचे ते फेलो झाले. त्यांना बागकाम, गिर्यारोहण यांची आवड होती. तसेच रवींद्रनाथ टागोरांच्या साहित्याचा त्यांनी अभ्यास केला होता. परिषदावेळी ते आजूबाजूच्या प्रेक्षणीय स्थळांना भेटी देत. यातून त्यांनी धार्मिक, सांस्कृतिक, तत्त्वज्ञान, कला, वास्तुशास्त्र, इतिहास या विषयात स्वारस्य घेत त्यावरील ग्रंथ वाचन केले. चेपल हिल येथे असताना त्यांनी आपल्या पत्नीसह फुले, झाडे-झुडपे असलेली एक बाग तयार केली होती. त्यांच्या प्रवासादरम्यान जगातील प्रमुख कलादालनांना भेट देऊन इतिहास, कला आणि संस्कृतीतही त्यांना उत्कट रस होता हे दाखविले. त्यांच्याकडे कला आणि इतिहासावरील पुस्तकांचा उत्तम संग्रह होता. त्यांचे वयाच्या ८६ व्या वर्षी (१९८७) निधन झाले. त्यांच्या मृत्यूनंतर, इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिट्यूटने डिसेंबर १९८८ मध्ये कोलकाता येथे बोस त्यांच्या स्मरणार्थ 'कॉम्बिनेटोरियल मॅथेमॅटिक्स अँड ॲप्लिकेशन्स' परिषद आयोजित केली. १९९५ मध्ये फोर्ट कॉलिन्स येथे 'आरसी बोस मेमोरियल कॉन्फरन्स' आयोजित करण्यात आली होती. डिसेंबर २००२ मध्ये भारतीय सांख्यिकी संस्थेने कोलकाता येथे 'आरसी बोस शतकोत्तर सिम्पोजियम ऑन डिस्क्रिट मॅथेमॅटिक्स अँड ॲप्लिकेशन्स' आयोजित केले होते.त्यांना विनम्र अभिवादन !!

**- प्रा. विजय कोष्टी, सांगली.**

## जन्म हा अखेरचा

# प्राणानुग्रहस्थल - ३



परंतु ज्याच्या आधारावर तो वृक्ष उभा असतो ती मुळे मात्र आपल्याला दिसत नसतात. ज्याने झाड लावले त्याला मात्र त्याच्या मुळाची कल्पना असते. तो पाणी मुळाला घालतो. फांद्यावर किंवा पानांवर शिंपडत नाही. त्याप्रमाणे प्रत्येक वस्तूचे एक मूळ असते, आधार असतो. पंचमहाभूते एकावर एक अशी आधारलेली असतात. पृथ्वीचा आधार जल, जलाचा आधार तेज, तेजाचा आधार वायू, वायूचा आधार आकाश आणि आकाशाचा आधार परब्रह्म होय. आणि परब्रह्माचा आधार? दुसरे परब्रह्म मानावे काय? मग दुसऱ्या परब्रह्माचा आधार तिसरे परब्रह्म होईल. असा अनवस्था प्रसंग येईल. म्हणून शेवटी एक असा आधार मानावा लागतो की, ज्याला दुसऱ्या कशाचाही आधार नाही, परंतु जो सर्वांना आधारभूत आहे. पंचमहाभूते परमात्म्यातून निर्माण झाली. ती त्याच्यातच स्थिर आहेत आणि शेवटी त्याच्यामध्येच विलीन होणार आहेत. म्हणून परमात्मा पंचमहाभूतांचा आधार होय. शरीराचा आधार प्राण आहे तर प्राणाचा आधार परमात्मा आहे. भगवान शिव हे सर्व कारणांचे कारण आहे.

शिव हा निराधार अर्थात् आधाररहित आहे. मंदिरात मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना केली जाते. जोपर्यंत प्राणप्रतिष्ठापना होत नाही तोपर्यंत मूर्तीच्या पूजेचे फळ मिळत नाही. दुकानात देवतांच्या अनेक मूर्ती पडलेल्या असतात. त्यांची कुणी पूजा करीत नाही. कुणी आरती करीत नाही की त्यांना काही मागत नाही. त्यांना देवतेचा आकार मिळालेला असतो, परंतु त्यांच्यावर संस्कार झालेला नसतो. प्राणप्रतिष्ठापना न झाल्यामुळे त्या मूर्ती पुजनीय नसतात. मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना संतांच्या अथवा श्रीगुरुंच्या हस्ते होते, त्याप्रमाणे शरीरात प्राणाची प्रतिष्ठापना कुणी केलेली असते? जो आधाररहित असून सर्व जगताचा आधार आहे अशा भगवान शिवाकडून प्रत्येक जीवात्म्याच्या शरीरात प्राणाची प्रतिष्ठापना झाली आहे. जड शरीरात प्राणाचा प्रवेश झाल्यामुळे ते रसरशीत आणि चैतन्यमय दिसू लागते. केवळ प्राणच नव्हे तर त्यांच्यासोबत स्वतः भगवान शिवदेखील प्रत्येकाच्या हृदयात वास्तव्य करु लागते. गर्भातील बालकाच्या मस्तकाच्या मध्यातून प्राण शरीरात प्रवेश करतो, असे शास्त्रात म्हटले आहे. म्हणून बाळाच्या जन्मानंतर त्याची तेलाने टाळू भरली जाते. मस्तकाच्या रंध्रातून प्राणाने पुन्हा बाहेर जाऊ नये, म्हणून ते रंध्र जणू बंद केले जाते. केवळ योगीच शरीरात जेथून प्राण प्रविष्ट झाला तेथून प्राण बाहेर नेऊ शकतो, म्हणून ते रंध्र जणू बंद केले जाते. **(क्रमश:) - काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# गोवा शासनाचा स्तुत्य निर्णय

गोव्यात अनेक वर्षे पोर्तुगीजांनी राज्य केले. या कालावधीत त्यांनी हिंदूंची अनेक मंदिरे पाडली. पाडलेल्या या सर्व मंदिरांचा जीर्णोद्धार करण्याचा निर्णय गोवा शासनाने घेतला असून परकीय आक्रमकांनी पाडलेल्या देशभरातील सर्व मंदिरांचा केंद्र सरकारने जीर्णोद्धार करून भारताचा सांस्कृतिक वारसा जपावा, अशी मागणी गोव्यात सुरु असलेला वैश्विक हिंदु राष्ट्र महोत्सवात करण्यात आल्याचे वृत्त वाचनात आले.

भारतीय इतिहासात डोकावून पाहिल्यास एकेकाळी सर्व सुखसुविधांनी समृद्ध असलेल्या, वैभवाची खाण असलेल्या भारतभूमीवर अनेक परकीय आक्रमकांनी आक्रमणे करून येथील वैभव लुटून नेले, पुरातन संस्कृतीचे प्रेरणास्रोत असललेली मंदिरे जमीनदोस्त केली. त्याठिकाणी त्यांची प्रार्थनास्थळे बांधली. शालेय अभ्यासक्रमात आक्रमकांचा इतिहास आपण अभ्यासला मात्र त्यातील आक्रमकांची क्रूरता आपल्याला कधी शिकवलीच गेली नाही.

देशभरात आज अशी अनेक मंदिरे आहेत जी जीर्णोद्धाराच्या प्रतीक्षेत आहेत, ज्यांच्या



खुणा नाहिशा करण्याचा, खरा इतिहास झाकोळण्याचा प्रयत्न केला जात आहे. ७५ वर्षांपूर्वी देश स्वतंत्र झाला मात्र, ही देवालये अद्यापही पारतंत्र्यात आहेत. त्यांच्या स्वातंत्र्यासाठी न्यायालयीन लढाया लढाव्या लागत आहेत.

सरकार मात्र यासाठी काहीच करताना दिसत नाही. या पार्श्वभूमीवर गोवा शासनाने घेतलेला निर्णय अभिमानास्पद असून अन्य राज्यातील जनतेनेही आक्रमकांनी पाडलेल्या पुरातन मंदिरांचा जीर्णोद्धार करण्याची राज्य सरकारकडे मागणी करावी.

**- ज्योती रावराणे, मुंबई.**

## सद्भावना जोपासावी

सर्वसामान्य जनता कोणत्या अवस्थेत जगत आहे? याचे राजकारण्यांना देणे-घेणे नाही. वैयक्तिक आरोप प्रत्यारोप, टीव्ही चॅनेल्सवर येऊन वादविवाद हेच सुरू आहे. एकमेकांवर टीकाटिप्पणी, खालच्या पातळीवर जाऊन काहीही बोलणे यातून कोणते जनहित होणार आहे? एकेरी उल्लेख करून बोलणारे नेते कोणती सद्भावना जोपासत आहेत?

**- प्र. मु. काळे, नाशिक.**



# - संतविचार -

**डॉ. देविदास गुरव, सोलापूर**

# 'नाम विठोबाचे घ्यावे'

**'नाम विठोबाचे घ्यावे । मग पाऊल टाकावे ।।**
**नाम तारक हे थोर । नाम तारिले अपार ।।**
**अजामेळ उध्दरिला । चोखामेळा मुक्तीस नेला ।**
**नाम दळणी कांडणी । म्हणे नामयाची दासी' ।।**

अत्यंतिक कष्टमय जीवन जगणाऱ्या संत जनाबाईंचा हा अभंग तिचे जीवनरंग उलगडणारा आहे. अर्थात तिच्या साऱ्या रचनांमधून तिचे भक्तिमय अंतरंग जाणवतेच. परंतु अपार कष्टातून विठ्ठलाचे वैशिष्ट्यपूर्ण वेगळे स्वरूप आपल्यापुढे उभे केले.


पोरके, परके व उपेक्षित जीवन जगूनही जीवनातील उदासिनता झटकून विठ्ठलास सर्वस्व मानले. तिचे पोरके जीवन भक्तीत उजळून निघाले. भगवंताचे नाम घेत तिच्या कष्टाला सुरूवात होत असे नि पुढे पुढे लौकिक कष्टातच विठ्ठलास पाहू लागली. 'विठ्ठलची तिचा जीवनाधार'झाला. रोजच हाताने प्रापंचिक कर्मे व मुखाने ती विठ्ठलाशी संवाद साधू लागली. म्हणजेच एकप्रकारे ती विठ्ठलाशी सख्य साधू लागली. आपली व्यथा सांगू लागली.

**'दळिता कांडिता । तुज गाईन अनंता ।।**
**न दिसावे क्षणभरी । तुजे नाम गा मुरारी ।।**
**नित्य हाचि कारभार । मुखी हरि निरंतर ।।**
**मायबाप बंधु बहिणी । तू बा सखा चक्रपाणी ।।**
**लक्ष लागले चरणासी । म्हणे नामयाची दासी' ।।**

आता मायबाप, बंधू सखा तूच आहेस. अनंता! प्रत्येक ठिकाणी तूच आहेस, माझे नित्य कर्म तुझ्या चरणी अर्पण करत आहे. विठ्ठलच तिचे अंतिम ध्येय होते. अवघे जीवन कष्ट सोसणाऱ्या संत जनाबाईंनी भक्तीने विठ्ठलाला वश केले होते. तिचा हा जीवनानुभव काही अभंगातून व्यक्त झाला आहे. उदा. खालील अभंग

**'झाडलोट करी जनी । केर भरी चक्रपाणी ।। किंवा**
**'जनी जाय पाणीयासी । मागे धावे हृषीकेशी ।। किंवा**
**'जनी जाय शेणासाठी । उभा आहे तिच्यापाठी'**

जनाबाईच्या भक्तित आधीन झालेला भगवंत तिच्या प्रत्येक कामात हातभार लावतो. परंतु विठ्ठलाशी हितगुज करत असताना तिच्या कष्टाला, श्रमाला विश्रांती नव्हती. उत्कट भक्तीला कठोर श्रमाची जोड देऊन विठ्ठलाला आपलेसे केले. स्त्री संताच्या वाट्याला कष्ट, अवहेलना जाच, त्रास होता. तरीही सर्वांनी



त्यांच्या साऱ्या व्यथा दुःख सोशिकपणे सहन केले. प्रसंगी अंतरिची वेदना नैराश्य, खिन्नता वाणीतून अभिव्यक्त झाल्या. तरी त्यांच्या भक्तित कुठेच उणीव जाणवत नाही. हे त्यांचे सामर्थ्य आहे. ती ताकद स्वानुभवातून त्यांना प्राप्त झाली. संत जनाबाईंचे भक्तिसंपन्न जीवन वेगळेच होते.

**'दळू कांडू सर्व पाप जाळू' किंवा**
**'देव खाते देव पिते । देवावरी मी निजते ।।**
**देव देते देव घेते । देवासवे व्यवहारिते'।।**

यासारख्या रचनांमधून त्यांची निर्गुण भक्तीकडे होणारी वाटचाल जाणवते. सर्व पाप-ताप कसे जाळावे, सर्व जिवांमध्ये परमात्मा कसा अनुभवावा तसेच ब्रह्मैक्य कसे साधावे हे स्वानुभवातून संत जनाबाईंनी येथे व्यक्त केले आहे.

एकंदरीत सर्व संतांच्या मांदियाळीत तिचे कर्तृत्व विशेष उठून दिसते हे मात्र खरे.

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## भरले आणि काळे यांच्यासह १८ शिक्षकांचा सेवापूर्तीनिमित्त सन्मान

**सोलापूर** : महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघ, दक्षिण सोलापूर तालुका प्राथमिक शिक्षक संघ आणि दक्षिण सोलापूर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेतर्फे शिक्षक नेते शिवानंद भरले आणि बाळासाहेब काळे यांचा व इतर दक्षिण सोलापूर तालुक्यातील १८ सेवानिवृत्त शिक्षकांचा सेवापूर्ती निमित्त रविवारी सन्मान करण्यात आला. जुळे सोलापुरातील मांगल्य बँक्वेट्स येथे झालेल्या या कार्यक्रमास जिल्हाभरातून शिक्षकांनी हजेरी लावली.

याप्रसंगी व्यासपीठावर खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी, माजी पालकमंत्री आ. विजयकुमार देशमुख, माजी सहकारमंत्री सुभाष देशमुख, विक्रीकर उपायुक्त सारिका भरले, अखिल भारतीय प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष माधवराव पाटील, भाजपचे दक्षिण सोलापूर तालुका अध्यक्ष रामप्पा चिवडशेट्टी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक बाळासाहेब शेळके, भीमाशंकर जमादार, राजाराम वरुटे, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष केशवराज जाधव, सरचिटणीस लायक पटेल, कोषाध्यक्ष संभाजी बापट, अंकुश काळे, शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष अनिल कादे, म.ज.मोरे, अंकुश काळे, माजी गटशिक्षणाधिकारी मल्हारी बनसोडे आदी उपस्थित होते. याप्रसंगी सेवापूर्ती निमित्त शिवानंद भरले आणि बाळासाहेब काळे यांना हार, फेटा बांधून सत्कार करण्यात आला. तसेच शिवानंद भरले यांना एक तोळे सोन्याची अंगठी व सन्मानपत्र शिक्षकांकडून देण्यात आले. खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी म्हणाले, शिवानंद भरले आणि बाळासाहेब काळे यांनी शिक्षकांचे नेतृत्व करत असताना शिक्षकांना न्याय मिळवून दिला. शिक्षकांच्या अडीअडचणीला धावून जाण्याच्या वृत्तीमुळे भरले व काळे यांनी शिक्षकांच्या समस्या सोडवण्यात यशस्वी झाले. त्यांच्याकडून प्रेरणा घेऊन इतर शिक्षकांनीही शिक्षकांना न्याय मिळवून देण्यासाठी सक्रिय व्हावे, असेही खा. डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी यांनी सांगितले.

## मोलकरणीला मारहाणप्रकरणी डॉक्टर दाम्पत्यास अटकपूर्व जामीन

**सोलापूर** : मोलकरणीला मारहाण केल्याप्रकरणी डॉ. विजयकुमार इंगळे व डॉ. दीपा इंगळे (दोघे रा.अभिमानश्रीनगर) या दाम्पत्याला मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती अनुजा प्रभुदेसाई यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला. तक्रारदार महिला ही डॉक्टर दाम्पत्यांच्या घरी बालसंगोपन व घरकाम करीत होते. तिची मुलगी ममता ही डिलिव्हरीकरिता माहेरी असल्यामुळे तिची देखभाल करण्याकरिता फिर्यादी ऐवजी घराशेजारी राहणाऱ्या ओळखीच्या महिलेला घरकामाकरिता डॉक्टरांच्या घरी पाठिवले.

दुसऱ्या महिलेने तब्येत ठीक नसल्याने कामावर येऊ शकत नाही म्हणून डॉक्टर दाम्पत्यास सांगितले असता त्यांनी फिर्यादी व तिच्या ओळखीची महिला दोघींना घरी बोलावून घेतले. त्यावेळी डॉक्टरांनी तुम्ही कामावर का आला नाही, म्हणून शिवीगाळ व दमदाटी करुन मारहाण केली. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला. याप्रकरणी डॉक्टर दाम्पत्यांनी मुंबई उच्च न्यायालय येथे अटकपूर्व जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. आरोपीच्या वकिलांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन न्यायमूर्ती प्रभुदेसाई यांनी आरोपींना अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. यात आरोपीतर्फे ॲड. विक्रांत फताटे व ॲड. राजशेखर वरदाळे यांनी तर सरकारतर्फे ॲड. आर. एम. पेठे यांनी काम पाहिले.

## ३० जून हा आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खो खो दिन साजरा करा : डॉ. चंद्रजित जाधव

**सोलापूर** : भारतीय खो खो महासंघाने ३० जून हा आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खो खो दिन तसेच २३ जून ते ३० जून हा आठवडा आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खो खो आठवडा म्हणून साजरा करावा, असे आवाहन केले आहे.

त्यानुसार राज्यातील सर्व जिल्हा खो खो संघटनेने आपल्या जिल्ह्यामध्ये २३ जून ते ३० जून हा आठवडा व ३० जून हा दिवस आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खो खो दिन म्हणून साजरा करावा. या खो खो दिनानिमित्त प्राविण्यप्राप्त खोखो खेळाडूंचा सत्कार, आरोग्य शिबिर, व्याख्यानमाला, वृक्षारोपण आदी विविध उपक्रम घेऊन आपल्या जिल्ह्यात खो खो दिन साजरा करावा, असे आवाहन भारतीय खो खो महासंघाचे सहसचिव डॉ. चंद्रजित जाधव व महाराष्ट्र खो खो असोसिएशनचे सरचिटणीस ॲड. गोविंद शर्मा यांनी केले आहे.

### मिनी मंत्रालयात कार्यालयीन कामकाजाचा शिमगा

# जि. प. चे कामकाज तीनच दिवस सुरळित

सुराज्य/सोलापूर

**जिल्हा परिषद म्हणजे जिल्ह्याचे मिनी मंत्रालय असेच संबोधले जाते. मात्र या मिनी मंत्रालयात कार्यालयीन कामकाजाचा शिमगा होत असल्याचे दिसत आहे. कार्यालयीन कामकाज मागील सहा महिन्यापासून आठवड्यातून केवळ सोमवार मंगळवार आणि बुधवार असे तीनच दिवस सुरळीत झाल्याचे दिसते. त्यानंतर गुरुवार आणि शुक्रवार साइटवर आणि शनिवार, रविवार सुट्टी. मग स्वामी साहेब तुम्हीच सांगा आठवड्यातून केवळ तीन. चार दिवस जर मुख्यालयात कामकाज चालत असेल तर विकास कामाचे काय होणार? असा सवाल जिल्हा परिषदेच्या माजी सदस्यांकडून केला जात आहे.**

सोलापूर मुख्यालय म्हणजे जिल्ह्याचे मिनी मंत्रालय. मग या मुख्यालयात कर्मचारी पूर्ण आठवड्याचे पाच दिवस काम करतात का ? तर खेदाने म्हणावे लागेल नाही. कारण बरेचसे कर्मचारी हे बाहेरून येतात. सोमवार, मंगळवार आणि बुधवार असे तीनच दिवस आपले कार्यालयीन कामकाज सुरळीत करतात .मात्र गुरुवार आणि शुक्रवारी साइटवर गेल्याचे संबंधित कार्यालयाकडून सांगितले जाते. त्यानंतर शनिवार आणि रविवारची सुट्टी असे आठवड्यातून केवळ आणि केवळ तीन ते चार दिवसच कर्मचारी कार्यालयीन कामकाज करत असल्याचे दिसत आहे.

कर्मचाऱ्यांबरोबर विभाग प्रमुखांचेही काम तशाच प्रकारे सध्या होत असल्याचे प्रत्येक कार्यालयामध्ये दिसून येत आहे. कर्मचारी साइटवर गेलेत की घरी याची आजपर्यंत एकदाही प्रशासनाने चौकशी केली नाही. निदान यापुढे तरी आपण स्वतः कार्यालयात जाऊन



कर्मचाऱ्यांचे आणि विभाग प्रमुखांची चौकशी करायला पाहिजे. कर्मचाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे गुरुवार आणि शुक्रवार या दिवशी जिल्हा परिषद कार्यालय आणि प्रांगण गेल्या सहा महिन्यापासून ओस पडल्याचे दिसत आहे. पैसा आणि वेळ वाया गेल्याने कामे वेळेवर होत नाहीत.

तेव्हा स्वामी साहेब आपण तरी यात लक्ष घाला. अचानक आठ-पंधरा दिवसातून प्रत्येक कार्यालयाशी तपासणी करा. किती कर्मचारी टेबल ला काम करीत आहेत .किती जण दांडी मारून बाहेर गेले आहेत. हे आपण प्रत्यक्ष तपासणी करून पहा म्हणजे आपल्या लक्षात येईल. तसेच कर्मचाऱ्यांबरोबर विभाग प्रमुखांना ही तशा प्रकारच्या सूचना देऊन कामकाजामध्ये बदल करण्यास सांगावे अशा प्रकारचे मागणी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्यांकडून होत आहे.

# घरगुती ताडी दुकाने बंद करा

## अन्यथा २१ जूनपासून उपोषणाचा इशारा

सुराज्य/पंढरपूर



शहरात बेकायदेशीर बनावटी व विषारी ताडी दुकाने मोठ्या प्रमाणात चालत असून यामुळे कामगार वर्ग पुरता व्यसनाच्या आहारी गेला आहे. अनेक कामगार मृत्युमुखी पडले आहेत. याचा विचार करून घरगुती ताडी दुकाने तातडीने बंद करण्यात यावीत, अन्यथा येत्या २१ जूनपासून आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र कामगार सेनेचे प्रदेशाध्यक्ष विष्णू कारमपुरी यांनी दिला.

ही ताडी दुकाने विशेष करून झोपडपट्टी, कामगार वस्ती, गुन्हेगारी लोकवस्ती अशा ठिकाणी आहेत. सर्व दुकानात केमिकल विषारीयुक्त औषधाने ताडी बनविली जाते. ही ताडी प्राशन केल्याने अनेक लोकांनी जीव गमावले आहेत. त्यामुळे त्यांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. बेकायदेशीर घरगुती ताडी दुकानांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी महाराष्ट्र कामगार सेनेच्यावतीने वारंवार करण्यात येत आहे. तरीही उत्पादन शुल्क अधीक्षक व पोलीस कारवाई करीत नाहीत. याउलट यांची या धंदेवाल्यांशी सलगी असल्याचे दिसून येते, असा आरोप कारमपुरी यांनी केला आहे. आता ८ दिवसात शहरातील सर्व घरगुती बेकायदेशीर ताडी दुकाने बंद करण्यात यावीत, अन्यथा महाराष्ट्र कामगार सेनेच्यावतीने आमरण उपोषण करण्यात येईल, असा इशारा कारमपुरी यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

निवेदन देणाऱ्या शिष्टमंडळात रेखा आडकी, विठ्ठल कुऱ्हाडकर, लक्ष्मीबाई इप्पा, जमुनाबाई लंगडेवाले, पप्पू शेख, मुनीर रंगरेज, गुरुनाथ कोळी, जुबेर कमिशनर आदी कामगार सेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

## मैंदर्गी जि.प. शाळेचा पहिला दिवस विविध उपक्रमांनी साजरा

सुराज्य/सोलापूर

अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुलींच्या शाळेचा पहिला दिवस विविध उपक्रमांनी तसेच प्रत्येक विद्यार्थ्यांचा गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले.

सन २०२३ व २४ शैक्षणिक वर्षातील शाळेच्या पहिल्या दिवशी इयत्ता पहिली ते सातवी मधील सर्व विद्यार्थिनींचा आणि पालकांचा शाळेच्या पटांगणातील प्रवेशद्वारावर प्रत्येक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य नव्याने इयत्ता पहिलीत २५ विद्यार्थिनी गणवेश वाटप शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सुरेश पाटील यांच्या हस्ते गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. शहराच्या प्रमुख मार्गावरून जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुलींच्या शाळेतील मुलींनी डॉल्बी म्युझिक द्वारे प्रभात फेरी काढण्यात आली या प्रभात फेरी दरम्यान शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी तसेच मुलींच्या सर्वांगीण विकासासाठी अशा विविध उपक्रमांचा म्युझिक लावून विद्यार्थ्यांचा पहिला दिवस जल्लोष साजरा करण्यात आला. यावेळी मुख्याध्यापक महांतेश्वर कट्टीमनी गुरुलिंगप्पा शिवणगी रमेश जुजगर बसवराज हिप्परगी आधी शिक्षक वृंद व पालक सहभागी झाले होते.

## होलार समाजाच्या मागण्यांसाठी आज रास्ता रोको आंदोलन

सुराज्य/सांगोला

होलार समाज अभ्यास आयोग स्थापन करावा,होलार समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे,या व इतर महत्वाच्या मागण्यांसाठी सोमवारी १९ जून रोजी सकाळी १० वा.सांगोला येथील पंचायत समिती समोरील पंढरपूर-मिरज हायवेवर स्वाभिमानी होलार समाज संघटना व बहुजन सामाजिक संघटनेच्या वतीने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.

होलार समाज अभ्यास आयोग स्थापन करावा, होलार समाजासाठी स्वतंत्र आर्थिक विकास महामंडळ स्थापन करावे,नाझरा (ता.सांगोला) येथील युवक नेते नितीन रणदिवे यांच्यावर झालेला खोटा गुन्हा मागे घ्यावा,नांदेड जिल्ह्यातील अक्षय भालेराव यांच्या खून प्रकरणातील आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी व त्या कुटुंबाचं पुनर्वसन महाराष्ट्र शासनाने करावे तसेच सांगोला तालुक्यातील बेरोजगारांना व युवकांना उद्योग व्यवसायासाठी मुद्रा लोन योजना प्रभावी अंमलबजावणी साठी सांगोला तहसीलदार यांनी बैठक आयोजित करावी,सांगोला शहरात होलार समाजासाठी स्वतंत्र बहुउद्देशीय सभागृह उभारण्यात यावे व सांगोला तालुक्यातील ग्रामपंचायत हद्दीत पूर्वीपासून राहणाऱ्या नागरिकांना त्या जागा नोंदीत करून महाराष्ट्र शासन याऐवजी, मूळ मालकाच्या नांवे असेसमेंट करुन ग्रामपंचायत उतारा देण्यात यावा.

अंगणवाडी पदोन्नतीमध्ये जो काळा बाजार झालेला आहे तो,त्वरित थांबवून मूळ मागासवर्गीयांना पदोन्नती देण्यात यावी,वरील सर्व मागण्या मान्य करण्यासाठी होलार समाजाचे महाराष्ट्राचे नेते शिवाजीराव जावीर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात येणार आहे,अशी माहिती रास्ता रोको आंदोलनाचे आयोजक दिपक ऐवळे (कमलापूर) यांनी पत्रकार परिषदेत दिली असून होलार समाज व बहुजन समाजातील नेते व कार्यकर्त्यांनी या आंदोलनात सहभागी होऊन वरील मागण्या मान्य करुन घेण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे,असे आवाहनही केले आहे.



## सग्गम यांच्या स्मरणार्थ ३५० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

सुराज्य/सोलापूर

दि आर्ट ऑफ लिव्हिंग, श्री मार्कंडेय प्रतिष्ठान व सोलापूर जिल्हा मंडप न्ड इलेक्ट्रिक डेकोरेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कै. निर्मला- कै. नागनाथ भुमय्या सग्गम यांच्या स्मरणार्थ ३५० गरजू विद्यार्थ्यांना मोफत वह्या व शालेय साहित्य वाटप करण्यात आला.

जुना विडी घरकुल येथील निर्मल मंगल कार्यालय,जवाहर नगर येथे हा कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी महापौर महेश कोठे, माजी नगरसेवक प्रथमेश कोठे, विठ्ठल कोटा, डॉ. नरसिंहस्वामी मामड्याल, सोलापूर मंडप डेकोरेशनचे अध्यक्ष अनिल गवळी, सुनील साबळे, रवी बडगू, श्रीधर सुरा आदी उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना मोफत वह्या व शालेय साहित्य वाटप करण्यात आला. सदर कार्यक्रमात १५० विद्यार्थ्यांना सॅक, कंपास आणि वह्या तसेच २०० विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले.

हा कार्यक्रम निर्मल मंगल कार्यालयाचे मालक पुरुषोत्तम सग्गम यांच्यातर्फे आयोजन करण्यात आले. यावेळी बिटला प्रशालेच्या विद्यार्थिनी भावना पगडयाल यांनी पुरुषोत्तम सग्गम यांचे कृतज्ञता व्यक्त केली.

यावेळी दासरी शाळेच्या प्रतिनिधी संगीता भैरी, बिटला प्रशालेच्या मुख्याध्यापिका शारदा गोरट्याल, राजर्षी शाहू प्रशालेच्या प्रतिनिधी लोहार, संभाजीराव शिंदे प्रशालेचे शिक्षक राजेश चौरे, मोरे, दि आर्ट ऑफ लिव्हिंगचे प्रशिक्षक पुरणचंद्र पुलगम, रविकुमार कोटा, उमाश्री जिल्ला आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभारप्रदर्शन भालचंद्र पगडयाल यांनी केले. अंबादास साका, श्रीनिवास वल्लभदेशी, प्रशांत येमूल, श्रीनिवास यलगम आदींनी परिश्रम घेतले.

# पायी जाताना चक्कर येऊन पडल्याने मृत्यू

सुराज्य/सोलापूर

पायी जात असताना चक्कर येऊन पडल्याने महादेव दगडू माने (वय ५५ रा. मड्डीवस्ती,भवानी पेठ) हे जखमी होऊन उपचारादरम्यान मयत झाले. ते शनिवारी सकाळी ८ वाजेच्या सुमारास घोंगडेवस्ती भाजी मार्केट येथून पायी घराकडे निघाले होते.

नगरसेवक पाटील यांच्या कार्यालयाजवळ चक्कर येऊन पडल्याने ते बेशुद्ध झाले . त्यांना सपना (पत्नी) यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले असता ते रविवारी सकाळी मयत झाले. अशी नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली आहे.

### गॅसच्या भडक्याने विवाहितेचा भाजून मृत्यू

गॅसच्या शेगडीवर चहा करताना अचानक आगीचा भडका उडून भाजलेली फरजाना कलीम शेख (वय ३५ रा.वाघोली जि . लातूर) ही महिला उपचारादरम्यान सोलापुरातील शासकीय रुग्णालयात रविवारी सकाळी मयत झाली .

५ जून रोजी सायंकाळच्या सुमारास हा प्रकार लातूर येथे घडला होता . त्यांना लातूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरात कलीम शेख पती यांनी दाखल केले होते . उपचारादरम्यान त्या मयत झाल्या .अशी नोंद सिव्हील पोलिस चौकीत पोलिसात झाली आहे .

### भिमाई नगरात रॉडने मारहाण महिलेसह दोघे जखमी

विजापूर रोडवरील भिमाई नगरात घरात घुसून लोखंडी रॉड आणि लाथा बुक्क्याने केलेल्या मारहाणीत मेघराज कणीराम जाधव




(वय ३०) आणि शितल मेघराज जाधव (वय ३० दोघे रा. भिमाई नगर ) हे जखमी झाले. ही घटना शनिवारी रात्रीच्या सुमारात घडली. त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. काही कारण नसताना राहुल चंद्रकांत कदम आणि अन्य ७ जणांनी मिळून त्यांना मारहाण केली. अशी नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.

### मुळेगाव येथे अपघात; तेलंगणा येथील तिघे जखमी

हैदराबाद महामार्गावरील मुळेगाव तांडा येथे थांबलेल्या ट्रकला पाठीमागून बोलेरो मोटार धडकल्याने ज्योतीबाई मेघनाथ लावण्या (वय २५ ), मुकेश लावण्या (वय २०), आणि मेघनाथ लावण्या (वय २९ सर्व रा.नारायण पेठ,तेलंगणा ) असे तिघेजण जखमी झाले.

हा अपघात रविवारी पहाटे ५ वाजेच्या सुमारास घडला . ते सर्वजण टीएस३८-टी- १७८२ या मोटारीतून मुंबई ते हैदराबाद असा प्रवास करीत होते. जखमींना शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. या अपघाताची नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

### सोनगीरी जवळ कंटेनर पलटी

परांडा तालुक्यातील परांडा बार्शी रोडवरील सोनगीरी नदी जवळ साखर वाहतूक करणारा कंटेनर पलटी होऊन झालेल्या अपघाता मध्ये कंटेनर चे मोठे नुकसान झाले आहे. ही घटना गुरूवार दि १५ जून रोजी रात्री साडेदहा वाजेच्या सुमारास घडली.

परांडा शहर व परिसरात गुरूवार दि १५ जून रोजी दूपारी दोन वेग वेगळे अपघात झाला. या अपघात मध्ये वडनेर येथील रामा गायकवाड व परांडा येथिल १४ वर्षीय ओम काळे यांचा मुत्यू झालेला होता. ही घटना ताजी असतानाच केवळ काही तासाच्या नंतर दि १५ रोजी रात्री बार्शी तालूक्यातील इंद्रेश्वर शुगर कारखान्या तून साखर भरून परंडा मार्ग अहमदाबाद कडे निघालेला कंटेनर सोनगीरी नदीच्या पुलाजवळील कळनावर पलटी झाला , या अपघातात जिवीत हानी झाली नाही मात्र कंटेनर चे मोठे नुकसान झाले आहे.

## निधन वृत्त




### विष्णू यलगुलवार

**सोलापूर** : जुन्या आरटीओ जवळील काडादी चाळ येथील विष्णू बाळकृष्ण यलगुलवार (वय ८३) यांचे रविवारी दुपारी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्यावर मोदी येथील स्मशानभूमीत सोमवारी सकाळी ९ वा. अंत्यसंस्कार करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे. माजी आमदार प्रकाश यलगुलवार यांचे ते मोठे बंधू होत.



### तुळशीदास शेलार

**माढा** : येथील सेवानिवृत्त मुख्याध्यापक तुळशीदास शेलार ( वय ७४) यांचे आजारपणामुळे शनिवारी दि. १७ रोजी रात्री उशिरा निधन झाले. रविवारी सकाळी माढ्यातील हिंदु स्मशानभूमीत त्यांचेवर अंत्यसंस्कार करण्यात आले. माढ्यातील विठ्ठल मंदिराच्या जीर्णोद्धारात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. माढ्यातील शिक्षक उदय शेलार व किरण शेलार यांचे ते वडिल होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.



### लताबाई सालपे

**सोलापूर** : अक्कलकोट रस्त्यावरील संगमेश्वर नगर येथील लताबाई फुलचंद सालपे (वय ७०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, तीन मुले, दोन मुली, नातवंडे असा परिवार आहे.

## शासनाचे माजी सहसंचालक सुधाकर जोशी यांचे निधन

सुराज्य/सोलापूर



महाराष्ट्र शासनाच्या दुग्धविकास विभागाचे माजी सहसंचालक तथा 'दुध पंढरी'चे माजी मुख्य अधिकारी सुधाकर जोशी यांचे शनिवारी वृद्धापकाळाने पुण्यातील एका खासगी रुग्णालयात निधन झाले. ते ७९ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी स्मिता, चार विवाहित मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. पुण्यात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

सुधाकर जोशी हे गेल्या काही दिवसापासून आजारी होते. पुण्यातल्याच एका खासगी रुग्णालयातील अतीदक्षता विभागात त्यांच्यावर उपचार सुरु होते. चार दिवसापूर्वी प्रक्रुतीत सुधारणा झाली होती. परंतु अचानक श्वसनाचा त्रास सुरु होऊन ते बेशुद्ध झाले. शनिवारी सकाळी त्यांची प्राणज्योत मालवली, अशी माहिती त्यांचे जावई डॉ. नीरज रायते यांनी दिली.

सुधाकर जोशी एक उत्तम लेखक होते. त्यांनी विविध विषयांवर लेखमाला लिहिली. 'संचार'चे संस्थापक कर्मयोगी अप्पासाहेब काडादी यांच्या चरित्र ग्रंथाचे लेखनही त्यांनी केले. 'दुग्ध व्यवसायिका' या त्यांच्या पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा प्रथम पुरस्कार मिळाला होता.'याला जीवन ऐसे नाव' या एकपात्री प्रयोगांचे उत्पन्न त्यांनी समाजकार्यासाठी दिले होते. जुळे सोलापुरात त्यांच्याच पुढाकारातुन महाराष्ट्र साहित्य परिषदेची शाखा स्थापन झाली. पाच वर्षे ते या शाखेचे कार्याध्यक्ष होते.साहित्य, सामाजिक आणि कला क्षेत्रातील योगदानाबद्दल विविध संस्थांनी त्यांना गौरवले होते.शनिवारी मसाप जुळे सोलापुर शाखेच्या कार्यकारिणीच्या बैठकीत सुधाकर जोशी यांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.



## स्वेरीचे प्रा. अमरजीत केने यांना आय.आय.टी कानपूर कडून पीएच.डी.

✔ **पंढरपूर** : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पंढरपूर संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींगच्या संशोधन विभागाचे अधिष्ठाता प्रा. अमरजीत प्रकाशराव केने यांनी कानपूरच्या आय.आय.टी मधून पीएच.डी. पूर्ण केली आहे. त्यामुळे आता स्वेरीतील पीएच.डी. धारक प्राध्यापकांची संख्या ३६ इतकी झाली आहे. संशोधन विभागाचे अधिष्ठाता प्रा. अमरजीत केने यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंग या विभागातून एक्सपरीमेंटल इनव्हेस्टीगेशन अँड मॉडेलिंग ऑफ टूल हेल्थ मॉनिट्रींग सिस्टम युजींग मल्टीपल सेन्सर डाटा फ्युजन अप्रोचेस इन टर्निंग ऑफ हार्डनड स्टील' या विषयात पीएच.डी. पूर्ण केली.

डॉ. केने यांनी पीएच.डी. पूर्ण केल्याबद्दल त्यांचा तंत्रशिक्षण संचालनालयाचे माजी संचालक डॉ.एन.बी.पासलकर यांच्या हस्ते व डॉ. विजय केळकर, स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे, शैक्षणिक अधिष्ठाता डॉ.प्रशांत पवार यांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. यापूर्वी ते फ्रान्स मध्ये आयोजिलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभागी झाले होते. तसेच त्यांचे आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये ३ संशोधनपर लेख प्रसिद्ध झाले आहेत.

## अखिल गुरव समाज संघटनेच्या प्रदेश कार्याध्यक्षपदी अरुणकुमार तळेखेडे



✔ **सोलापूर** : येथील भारतीय माजी सैनिक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष श्री .अरुण कुमार तळीखेडे यांची नुकतीच अखिल गुरव समाज संघटनेच्या कार्याध्यक्ष पदीनिवड करण्यात आली. सदर निवड संघटनेचे संस्थापक राष्ट्रीयअध्यक्ष अण्णासाहेब शिंदे यांनी केली.अतिशय हतबल व दुर्लक्षित अशा समाज बांधवांना न्याय देण्यासाठी तळीखेडे यांचे निवड उपयोगी ठरणार आहे. अशा शुभेच्छा ज्येष्ठ कविवर्य गुरव समाजसेवक देवेंद्र औटी यांनी दिल्या. सुधाकर खराटे ,वसंत बंदावणे ,सुभाष अण्णा शिंदे, विलास पाटील ,रंगनाथ गुरव ,अनिल पुजारी यानी तळीखेडे यांचे अभिनंदन केले.

## पर्यटनाचे पॅकेज देतो सांगून फसवणूक; सहा जणांवर गुन्हा

✔ **सोलापूर** : पर्यटनाचे पॅकेज देतो असे सांगून फिर्यादी वीरेश शिवलिंगप्पा अंगडी (वय-४९,रा. उत्तर कसबा कुंभारवाडा यांनी निवडलेल्या पॅकेज मधील ठरलेल्या रकमेपेक्षाही ८० हजार रुपये इतकी ज्यादा रक्कम काढून घेऊन फसवणूक केली आहे. ही घटना दि.१२ फेब्रुवारी २०२३ ते १७ जून २०२३ दरम्यान गुडवन हॉस्पीटॅलीटी प्रायव्हेट लिमिटेड कंपनी येथे घडली. याप्रकरणी अंगडी यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अमित यादव,करण काळे,प्रेम,आर्यन व यांच्यासह दोन इस्मानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक माडे हे करीत आहेत.

## पत्नीस मारहाण करून जिवे मारण्याची धमकी ; दोघांवर गुन्हा

✔ **सोलापूर** : संगणमत करून पत्नीला लाथा बुक्क्यांनी तसेच बेल्टने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी दोघाजणांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना सात जून रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास बलदवा नगर येथे घडली. याप्रकरणी प्रियंका विनय दुलंगे (वय-३३,रा.बलदवा नगर) यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून पती विनायक दुलंगे व आशाबाई सुरेश दुलंगे (दोघे.रा.बलदवा नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास सहायक फौजदार दुधाळ हे करीत आहेत.

## दुभाजकावर लावलेले एलईडी लाईट चोरट्याने पळविली

✔ **सोलापूर** : विजापूर ते केगाव या बायपास रस्त्यावरील दुभाजकावर लावलेले ४५ हजार रुपये किमतीचे क्रॉम्प्टन कंपनीचे ९ पोल वरील ९ एलईडी लाईट अज्ञात चोरट्याने चोरून नेले आहे.ही घटना दि.२९ मे २०२३ रोजी देशमुख वस्ती जवळील ब्रिजवर घडली.याप्रकरणी श्रीधर लक्ष्मीकांतराव धम्मावलम (वय-४२,रा.नांदणी टोल प्लाजा,मंद्रूप) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या एलईडी लाईट २०१९ साली लावण्यात आल्या असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक कांबळे हे करीत आहेत.

## रिक्षाच्या धडकेत एक जण गंभीर; रिक्षाचालकावर गुन्हा

✔ **सोलापूर** : फिर्यादी पल्लवी जगन्नाथ चितळे (वय-२९,गणेश बिल्डर्स,रुबी नगर) यांचे वडील जगन्नाथ विश्वनाथ चितळे (वय-६२) त्यांच्या कामाच्या ठिकाणाहून चहा पिण्याकरिता बाहेर रस्त्याच्या कडेने चालत जात होते.

त्यावेळी पाठीमागून येणाऱ्या रिक्षा क्र.एमएच.१३.सीटी.८५०१ यातील चालक शिवशरण भीमराव चव्हाण (रा.सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर १,शहा नगर जवळ) याने त्याच्या ताब्यातील रिक्षा भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालून जगन्नाथ चितळे यांना धडक देऊन त्यांच्या डोक्यात गंभीर जखमी करण्यास कारणीभूत झाला आहे.ही घटना १७ जून रोजी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास यतीराज हॉटेलच्या शेजारी घडली.याप्रकरणी पल्लवी चितळे यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून शिवशरण चव्हाण यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल कंचे हे करीत आहेत.

## एकता नगरात तरुणास मारहाण; २४ जणांवर गुन्हा दाखल

✔ **सोलापूर** : तरुणाला मारहाण केल्याप्रकरणी चोवीस जणांवर गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना ऑक्टोंबर २०२२ मध्ये एकता नगर मैदानाजवळ घडली होती. याप्रकरणी साहेल घुडुभाई मुल्ला (वय-३०,रा.कर्णिक नगर) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.या प्रकरणी सचिन ऊर्फ डुकर्या कांबळे (वय-४०), ओम कसबे (वय-२५),विकी बनसोडे (वय-३५),पत्या मस्के (वय-३०, सर्व रा.कुमठा नाका) यांच्यासह १५ ते २० जणांवर गुन्हा दाखल झाला आहे.याप्रकरणी फिर्यादी हा कोर्टात गेला होता.त्यानंतर कोर्टाच्या आदेशानंतर हा गुन्हा दाखल झाला आहे.घटनेचा तपास पोलिस करत आहेत.

# प्रधानमंत्री किसान योजना महसूल विभागाकडून आता कृषी विभागाकडे हस्तांतरित

✔ सुराज्य/सोलापूर

**शेतकरी कुटुंबांना निश्चित उत्पन्न देण्यासाठी केंद्र शासनामार्फत सुरू करण्यात आलेली प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना महसूल विभागाकडून आता कृषि विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत लाभार्थी शेतकरी कुटुंबास प्रतिवर्षी रूपये ६ हजार रूपये तीन समान हप्त्यामध्ये लाभार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा केले जाणार आहेत.**




ही योजना कृषि विभागाकडे हस्तांतरित करण्याबाबत शासन निर्णय कृषी विभागामार्फत १५ जून, २०२३ रोजी पारीत करण्यात आला आहे. या शासन निर्णयान्वये प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत अर्जदारासह महसूल, कृषि आणि ग्रामविकास विभाग अशी विभागनिहाय कामकाजाची विभागणी करण्यात आली आहे. यामध्ये अर्जदार यांनी केंद्र शासनाच्या पोर्टलवर स्वयंनोंदणी करणे, केंद्रावर नोंदणी करणे, ई-केवायसी करणे, बँक खाते आधार कार्डशी संलग्न करावे अशा सूचना केल्या आहेत.

कृषि विभागाकडे स्वयंनोंदणीकृत लाभार्थ्यांच्या नोंदणीस मान्यता देणे, तालुकास्तरावर लाभार्थ्यांची नोंदणी पोर्टलवर करणे, अपात्र लाभार्थींना पडताळणीअंती पोर्टलवर चिन्हांकित करणे, भूमी अभिलेखाशी सबंधित माहिती वगळता इतर डाटा दुरुस्ती करणे, लाभार्थ्यांची भौतिक तपासणी करणे, मयत लाभार्थ्यांची नोंदणी पोर्टलवर करणे, चुकीने अपात्र लाभार्थ्यांना पात्र करणे, तक्रार निवारण करणे, सामाजिक अंकेक्षण करणे, योजनेची प्रचार प्रसिध्दी करणे तसेच योजनेच्या अनुषंगाने इतर कामकाज पाहणे अशी जबाबदारी देण्यात आली आहे.

एखादा लाभार्थी मयत झाल्यास त्याला पोर्टलवर अपात्र म्हणून मार्क करण्यासाठी त्याची माहिती तालुका नोडल अधिकारी यांचेकडे उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी ग्रामविकास विभागाकडे देण्यात आली आहे. जिल्हास्तरावर जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांना जिल्हास्तरीय नोडल अधिकारी आणि तालुका स्तरावर तालुका कृषि अधिकारी यांना तालुकास्तरीय नोडल अधिकारी म्हणून नियुक्त केले आहेत.

केंद्र शासनाच्या धर्तीवर राज्य शासनामार्फत ही नमो शेतकरी महासन्मान निधी योजना मान्यता देण्यात आली आहे. पी एम किसान योजनेतील सर्व पात्र लाभार्थी हे नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेस पात्र असणार आहेत. पी एम किसान योजनेअंतर्गत केंद्र शासनाकडून वेळोवेळी केले जाणारे बदल हे नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेस लागू राहणार आहेत. नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेअंतर्गत पहिला हप्ता येत्या काही दिवसांतच शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा होणार आहे. यासाठी कृषि आणि माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत पोर्टल विकसित करण्याची कार्यवाही सुरु आहे.

## महिलेची फसवणूक; बँकेच्या महिला मॅनेजरवर गुन्हा दाखल

✔ सुराज्य/सोलापूर

ऑनलाइन प द्वारे महिलेची फसवणूक केल्याप्रकरणी एका महिला बँक मॅनेजर वर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वाती दास असे गुन्हा दाखल झालेल्या आयसीआयसीआय बँकेच्या मॅनेजरचे नाव आहे.ही घटना १० जून रोजी सायंकाळी सहा ते नऊ वाजण्याच्या दरम्यान विजय देशमुख नगर येथे घडली.याप्रकरणी अपूर्वा संजय गायकवाड (वय-२६,रा.विजय देशमुख नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.

फिर्यादी यांना आयसीआयसीआय बँकेचे प्लॅटिनम कार्ड ऍक्टिव्ह करण्यासाठी स्वाती दास हिने फोन करून अपूर्वा यांची माहिती घेत असताना त्यांचा विश्वास संपादन करून बँकेचे मोबाईल प ओपन करण्यास सांगितले. त्यानंतर मार्चंट आऊटलाईट व ऑनलाईन हे ऑपरेशन ऑन करण्यास सांगून ते प्रोसेसमध्ये असताना,फिर्यादी यांना एक ओटीपी आला व त्यांनी तो ओटीपी स्वाती हिला शेअर केला. काही वेळाने अपूर्वा गायकवाड यांच्या क्रेडिट कार्ड वरून ६३ हजार ८१७ रूपये कट झाल्याचा मोबाईलवर मेसेज आला.त्यावेळी फिर्यादी यांना समजले की आपली आर्थिक फसवणूक झाली आहे. असे फिर्यादीत नमूद आहे.घटनेचा पुढील तपास पोलीस निरीक्षक जगताप हे करीत आहेत.

## सौंदरे येथून कांदा पेरणी यंत्राची चोरी

✔ सुराज्य/बार्शी

शेतात झाडाखाली ठेवलेले कांदा पेरणी यंत्र अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना बार्शी तालुक्यातील सौंदरे येथे घडली. दि २८ रोजी ही घटना घडली. अंबरीश भगवान कदम रा सौंदरे ता बार्शी यांनी शोध घेऊन उशिराने फिर्याद दिली आहे. त्यावरून बार्शी तालुका पोलिसात दि १६ रोजी अज्ञात व्यक्ती विरोधात चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादीने अहमदनगर येथून तीन वर्षांपूर्वी कांदा पेरणी यंत्र आणले होते. कांदा पेरणीचा हंगाम संपल्यानंतर त्यांनी ते यंत्र शेतातील आंब्याच्या झाडाखाली ठेवले होते. दि २८ मे रोजी सकाळी दहाच्या सुमारास ते व त्यांचे वडील तसेच भाऊ हे नेहमीप्रमाणे शेतात गेले असता त्यांना ते पेरणी यंत्र ठेवलेल्या ठिकाणी दिसले नाही. त्यांनी शेतात तसेच शेजारी शेतकऱ्यांकडे चौकशी केली. परंतु कांदा पेरणी यंत्र मिळून आले नाही. त्यानंतर त्यांनी याबाबत उशिराने बार्शी तालुका पोलिसात फिर्याद दिली.

## घरात घुसून चाकूचा धाक दाखवून महिलेच्या गळ्यातील दागिने लुटले

✔ सुराज्य/सोलापूर

घरात घुसून चाकूचा धाक दाखवून महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र,सोन्याची चैन व सोन्याचे कर्णफुले असा एकूण ७८ हजारांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दि.१८ जूनच्या पहाटे तीन ते साडेतीन वाजण्याच्या दरम्यान सेटलमेंट फ्री कॉलनी नंबर ३ रुक्मिणी मंदिराच्या मागे घडली.फिर्यादी रूपा श्रीनिवास गायकवाड व त्यांची दोन्ही मुले व फिर्यादी यांच्या बहिणीची मुलगी असे घरात झोपले होते.

त्यावेळी घराच्या दरवाजा वाजवण्याचा आवाज आल्याने रूपा गायकवाड या झोपेतून उठून त्यांनी दरवाजा उघडला. त्यावेळी दरवाजासमोर दोन इसम चाकू घेऊन उभे होते. त्यानंतर फिर्यादी यांच्या घरात त्यांनी प्रवेश केला.त्यावेळी फिर्यादी रूपा यांच्या गळ्यातील मणी मंगळसूत्र,सोन्याची चैन व कानातील सोन्याचे कर्णफुले काढून घेऊन चापट मारून चाकूचा धाक दाखवला.दरम्यान अज्ञात आलेल्या दोन इसमांनी फिर्यादीस घरातील पैसे कोठे आहेत ते काढून दे असे म्हणत असताना फिर्यादी यांची बहिणीची मुलगी दीपिका ही जागी झाली.त्यावेळी दीपिका हिला घरातील कपाटामधील पैसे घेऊन ये असे सांगितले.त्यावेळी निळ्या टी-शर्ट घातलेल्या इसमाने दीपिका हिला चापट मारून कपाटातील पैसे लवकर घेऊन ये असे म्हणाला.

तेव्हा दीपिका ही बेडरूम मध्ये जाऊन आरडाओरडा केल्याने दोन्ही इसम ७८ हजारांचा ऐवज बळजबरीने घेऊन गेले आहेत.असे फिर्यादीत नमूद आहे.याप्रकरणी रूपा गायकवाड यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली असून,त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात दोन इसमानविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक शेख हे करीत आहेत.

## तुझा सैराट करतो म्हणत तरुणाला मारहाण ; पाच जणांवर अॅट्रोसिटी अंतर्गत गुन्हा दाखल

✔ सुराज्य/सोलापूर

माझ्या मुलीसोबत लग्न करण्याची तुझी कुवत आहे का,तुझा सैराट करतो म्हणत तरुणाला मारहाण केल्याप्रकरणी पाच जणांवर ट्रोसिटी अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.याबाबत आकाश विश्वास आगवणे (वय-२६,रा.मीना नगर,बॉम्बे पार्क) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

फिर्यादी आकाश आगवणे हे मुळ बारामती येथील रहिवासी आहेत.त्यांचे घराशेजारी असणाऱ्या मुलीसोबत प्रेमसंबंध होते.यातून त्यांनी त्या मुलीसोबत मार्च २०२३ मध्ये पळून जाऊन लग्न केले.त्यानंतर फिर्यादी हे कामानिमित्त सोलापुरात येऊन काम करत आहेत.१७ जून रोजी फिर्यादी आसरा परिसरातील एका दुकानात काम करत असताना त्यांना मुलीकडील नातेवाईकांनी येऊन त्यांना तुझा सैराट करतो म्हणत त्यांना मारहाण केली. या प्रकरणी आगवणे यांच्या फिर्यादीवरून शहनाज महिबूब शेख,महिबूब गुलाम शेख, सोहेब महिबूब शेख (तिघे रा.गुणवडी,बारामती), वसीम शौकत शेख,शाहीद वाहिद शेख (दोघे.रा.शेख वस्ती, बोरीवेल,पुणे) यांच्यावर अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रतिबंध अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.या घटनेचा तपास पोलिस करत आहेत.



## महानगपालिका निवडणुकीत युवकांना संधी देण्यासाठी वाहिद बिजापुरे यांचे निवेदन

✔ सुराज्य/सोलापूर

आगामी महानगरपालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत जास्तीत जास्त युवकांना संधी देण्यात यावी अशा मागणीचे निवेदन शहर मध्य विधानसभा युवक काँग्रेसचे अध्यक्ष वाहिद नदाफ यांच्या नेतृत्वाखाली सर्वसंबंधितांना देण्यात आले.

प्रदेश कार्याध्यक्षा आ. प्रणिती शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्ष नाना पटोले, अखिल भारतीय युवक काँग्रेस अध्यक्ष बी. वी. श्रीनिवास, अखिल भारतीय युवक काँग्रेस प्रभारी कृष्णा अल्लावारुजी, महाराष्ट्र युवक काँग्रेस अध्यक्ष कुणाल राऊत, महाराष्ट्र युवक काँग्रेस प्रभारी मिर्तेद्र सिंग, युवक काँग्रेसचे नेते प्रदीप सिंधव, विजयसिंह यांच्याकडे ही निवेदन देण्यात आली.

टिळक भवन, मुंबई येथे महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसची आगामी निवडणुका संदर्भात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले आणि महाराष्ट्र प्रदेश युवक काँग्रेसचे अध्यक्ष कुणाल राऊत यांच्या अध्यक्षेतेखाली महत्वाची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

महानगरपालिका आणि इतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका नागरिकांच्या मूलभूत सोयीसुविधा संदर्भात निवडणूका असतात. आपली कामे व्हावीत अशी जनतेच्या अपेक्षा असतात ही अपेक्षा युवकच जास्त धड़पडीने पूर्ण करू शकतात आज अनेक युवकांना वाटते की महानगरपालिका व इतर स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत भाग घेऊन जनतेच्या अपेक्षा त्यांची कामे त्यांच्या अडचणी सोडवाव्या वाटतात.

यावेळी सोलापुर युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे, प्रदेश चिटणीस प्रवीण जाधव, दक्षिण अध्यक्ष महेश जोकरे, प्रदेश चिटणीस श्रीकांत वाडेकर, अरमान पटेल, अनवर फणिबंद, महेंद्र शिंदे, मनोहर चकोलेकर यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते.

## आभासी माध्यमांमुळे मानवी जीवनात कृत्रिमता : डॉ. पाटील

✔ सुराज्य/सोलापूर

आभासी माध्यमांमुळे मानवी जीवनात तुटलेपण आले असून ते वास्तव टिपण्याचे काम काळ'मेकर लाइव्ह .. ही कादंबरी करते, असे प्रतिपादन बालसाहित्यिक व कादंबरीकार डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले. महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे शाखा सोलापूरच्या वतीने शनिवार, दि.१७ रोजी वाचन संवाद' हा कार्यक्रम दूरदृश्य प्रणालीद्वारे आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमात प्रा.डॉ. बाळासाहेब लबडे लिखित काळ'मेकर लाइव्ह या कादंबरीविषयी ते बोलत होते. पुढे ते म्हणाले, काळमेकर लाइव्ह' ही समकालीन भान असलेली व वास्तव दर्शविणारी कादंबरी आहे. या कादंबरीला कोरोनाची पार्श्वभूमी आहे. आभासी माध्यमांमुळे माणसाच्या आयुष्यात विस्कळीतपणा, तुटलेपणा आला असून मूल्यभान हरवलेले आहे. नाती दुरावलेली असून माणूस एकलकोंडा होत असल्याने अनेक सामाजिक, कौटुंबिक, मानसिक समस्या निर्माण होत आहेत. नव्या माध्यमांची व्यसने माणसाच्या आयुष्याला चिकटली असून कोणताही घटक यास अपवाद राहिलेला नाही. सर्वत्र मानवी जीवनमूल्यांची पडझड झाली असून मानवी जीवन हे कृत्रिम झालेले आहे. या कादंबरीत लेखकाने हरवलेल्या मानवी मूल्यांचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रा. डॉ. बाळासाहेब लबडे यांनी या प्रसंगी आपले विचार व्यक्त केले. अध्यक्षीय समारोप डॉ. श्रुती वडगबाळकर यांनी केला. सुरुवातीला पाहुण्यांचे स्वागत व प्रास्ताविक डॉ. अर्जून व्हटकर यांनी केले.

परिचय राजेंद्र भोसले यांनी करून दिला. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन सौ.वंदना कुलकर्णी यांनी केले. या कार्यक्रमाची तांत्रिक बाजू वाचन संवाद प्रमुख डॉ. नरेंद्र काटीकर यांनी सांभाळली. या कार्यक्रमास गोविंद काळे, डॉ. मीरा शेंडगे, डॉ. अनंता सूर, डॉ. रामेश्वर सोळंकी, डॉ. शंकर धडके यांच्यासह साहित्यरसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पाठांतरापेक्षा कौशल्यपूर्ण शिक्षण महत्त्वाचे : ठोंबरे

✔ सुराज्य/सोलापूर

**▶▶ पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्य वाटप**
**▶▶ रोप फाऊंडेशन व श्रमिक पत्रकार संघ यांचा संयुक्त उपक्रम**

सद्यस्थितीत ज्या विद्यार्थ्यांना अधिक गुण मिळतात. तो बुद्धिमान असे समीकरण झाले आहे मात्र ते योग्य नाही. वास्तविक ज्यांना स्वतः समोरचे प्रश्न आणि समस्या सोडवण्याची क्षमता आहे. तोच करा बुद्धिमान आहे असे सांगतानाच पाठांतरापेक्षा सध्या कौशल्यपूर्ण शिक्षण महत्त्वाचे ठरत असल्याचे प्रतिपादन प्रभारी जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी येथे केले.

रोप फाउंडेशन व सोलापूर श्रमिक पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकारांच्या पाल्यांना शैक्षणिक साहित्य वाटप समारंभ रविवारी मंगळवेढेकर इन्स्टिट्यूट सभागृहात पार पडला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विचार मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, माजी महापौर महेश कोठे, बारामती ग्रोचे उपाध्यक्ष सुभाष गुळवे, राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल, रोप फाउंडेशनचे नजीम शेख, प्रशांत बाबर, श्रमिक पत्रकार संघाचे खजिनदार शरीफ सय्यद आदींसह मान्यवर उपस्थित होते. प्रारंभी प्रास्ताविक श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांनी केले तर स्वागत सरचिटणीस समाधान वाघमोडे यांनी केले. यावेळी रोप फाउंडेशनचे प्रशांत बाबर यांनी रोप फाउंडेशन राबवीत असलेल्या सामाजिक, शैक्षणिक उपक्रमाचे माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऐश्वर्या हिबारे यांनी केले.




### ९ जुलै सोलापुरात आयटी पार्कचे भूमिपूजन : कोठे

सोलापुरात येत्या ९ जुलै रोजी आयटी पार्क आणि रोबोट कारखान्याचे भूमिपूजन करण्यात येणार आहे. त्या भूमिपूजनासाठी राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार हे येणार आहेत. यामध्ये आमदार रोहित पवार यांचा सिंहाचा वाटा आहे. यामुळे विकासाला अधिक चालना मिळणार असल्याचे माजी महापौर महेश कोठे यांनी यावेळी सांगितले.

### पालकांनी मोठी स्वप्ने ठेवली पाहिजे : स्वामी

यश संपादन करण्यासाठी वेळेचे नियोजन आणि व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. पालकांनी आपल्या पाल्यांसमोर मोठी स्वप्न ठेवली पाहिजेत. त्या दृष्टीने प्रयत्न केले पाहिजेत. आत्मविश्वास हा यशस्वी होण्यासाठी महत्त्वाचा ठरतो, असेही मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी यावेळी सांगितले.

# गुरूपौर्णिमा उत्सवानिमित्त २३ जून पासून सांस्कृतिक कार्यक्रम

## स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३६ वा वर्धापनदिन होणार उत्साहात साजरा

सुराज्य/अक्कलकोट

**राज्यातील धार्मिक क्षेत्रात नियोजनबध्द मांडणी आणि आखणी असलेल्या सामाजिकतेच्या बरोबरच विविध क्षेत्रात उल्लेखनिय कार्य असलेल्या श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या ३६ वा वर्धापनदिन आणि श्री गुरूपोर्णिमा उत्सवानिमित्त न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली धर्मसंकिर्तन व सांस्कृतिक या कार्यक्रमाचे दि. २३ जून ते २ जुलै पर्यंत आयोजन करण्यात आल्याची माहिती न्यासाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांनी दिली.**

शुक्रवार दि. २३ जून रोजी सायंकाळी ६.३० मिनीटानी कार्यक्रमास प्रारंभ होणार असून अक्कलकोट विरक्त मठाचे श्री म.नि.प्र. पूज्य बसवलिंग महास्वामीजी, प.पू.श्री मोहन पुजारी - मुख्य पुजारी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान अक्कलकोट, डॉ.पुरुषोत्तम राजीमवाले -विश्व फौंडेशन शिवपुरी अक्कलकोट, वे.शा.सं.श्री अण्णू महाराज -पुजारी श्री स्वामी समर्थ समाधी माठ अक्कलकोट, तहसिलदार बाळासाहेब सिरसट , अक्कलकोट पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सचिन खुडे, अक्कलकोट नगर परिषदेचे मुख्याधिकारी सचिन पाटील, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या हस्ते श्री स्वामी समर्थाचे प्रतिमाचे पूजन, दिपप्रज्वलनाने सदर कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात येणार आहे.


शुक्रवार दि. २३ जून रोजी सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत नक्षत्रांचे देणे, थोर संगित दिग्दर्शक व गायक पद्मश्री पंडीतजी हृदयनाथ मंगेशकर, राधा मंगेशकर आणि सहकारी मुंबई यांचा कार्यक्रम सादर होणार आहे. शनिवार दि. २४ जून रोजी सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत भावभक्ती गीतांजली' लोकप्रिय मराठी भावगीते व भक्तिगीते सादरकर्ते सौ. प्रतिभा थोरात व सहकलाकार पुणे यांचा कार्यक्रम सादर होणार आहे.

रविवार दि.२५ जून रोजी सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत स्वर आर्या' एक भाव मैफिल, सादरकर्ते -आर्या आंबेकर आणि सहकारी मुंबई यांचा कार्यक्रम होणार आहे. सोमवार दि.२६ जून रोजी सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत शिवरंजनी' सोलापूर प्रस्तुत अमर लता' मराठी-हिंदी भाव-भक्तिगीते सादरकर्ते -निर्मिता- समीर रणदिवे, दिग्दर्शक -



उन्मेश शहाणे, संकल्पना - शाईवाले व मोहोळकर, निवेदन - माधव देशपांडे यांचा कार्यक्रम सादर होणार आहे.

मंगळावर दि.२७ जून रोजी सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत हास्य संजे' कन्नड विनोदी कार्यक्रम सादरकर्ते -गंगावती प्रणेश आणि सहकारी कर्नाटक यांचा कार्यक्रम होणार आहे. बुधवार दि.२८ जून रोजी सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत किर्तन' राष्ट्रीय किर्तनकार व समाज प्रबोधनकार ह.भ.प. निवृत्ती महाराज देशमुख, इंदोरीकर (संगमनेर, अकोलेकर) यांचा कार्यक्रम होणार आहे.





गुरुवार दि.२९ जून रोजी सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत व्याख्यान' विषय - सेवाभाव-अन्नदान व छत्रपती शिवाजी महाराज या विषयावर ख्यातनाम व्याख्याते - नितीन बानुगडे-पाटील यांचे व्याख्यान होणार आहे. शुक्रवार दि. ३० जून रोजी सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत रंग विनोदाचे, रंग सुरांचे' सादरकर्ते - श्रेया बुगडे, भाऊ कदम, कुशल बद्रिके, मेघना एरंडे व गायक- स्वप्नील गोडबोले, योगिता गोडबोले आणि सहकारी मुंबई यांचा कार्यक्रम होणार आहे.

शनिवार दि. १ जुलै रोजी सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत स्वामिनी प्रस्तुत हिटस् ऑफ कुमार शानु' सादरकर्ते -संदीप पाटील आणि सहकलाकार पुणे यांचा कार्यक्रम होणार आहे. रविवार दि. २ जुलै रोजी सायंकाळी ७ ते रात्रौ ९.३० पर्यंत श्री स्वामी समर्थ भक्त मंडळ, निपाणी प्रस्तुत सूर भक्तीचे उमटले भक्ती संगीत कार्यक्रम होणार आहे.

गुरूपौर्णिमे निमित्त सोमवार दि. ३ जुलै रोजी सकाळी ७ ते ९ पर्यंत श्री स्वामी समर्थ चरित्र सारामृत ग्रंथाचे पारायण, सकाळी ९ ते १० पर्यंत नामस्मरण, जप व श्री गुरूपूजा, सकाळी १० वाजता महानवैद्य सोलापूरचे पालकमंत्री ना.राधाकृष्ण विखे-पाटील, आमदार सचिन कल्याणशेट्टी, माजी गृहराज्यमंत्री सिध्दाराम म्हेत्रे, संजय शिंदे (पालखी संयोजक लांजा), अशोक बांदल (देणगीदार, खेड शिवापूर, पुणे) यांच्या हस्ते दाखविण्यात येणार आहे.

### गुणीजन व गुणवंत विद्यार्थी पुरस्कार

दिनांक २३ जून ते २ जुलै दरम्यान गुणीजन व गुणवंत विद्यार्थी पुरस्कार व सत्कार हे सांस्कृतिक कार्यक्रम प्रसंगी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

### समर्थ महाप्रसाद सेवा

अक्कलकोट शहरातील निराधार, दिव्यांग व गरीब–गरजूंना दैनदिन दोन्ही वेळेचे जेवण डब्यातून पुरविण्याचा स्तुत्य निर्णय घेण्यात आल्या प्रमाणे लाभार्थ्यांच्या पत्त्यावर सदर जेवणाचा डबा दररोज २५० जणांना देण्यात येतो.

सकाळी १०.३० ते दुपारी ४ वाजेपर्यंत सर्व स्वामी भक्तांना महाप्रसाद, दु. ४ वाजता श्री स्वामी समर्थांच्या पादुका पालखी, आणि न्यासाच्या सुशोभित केलेल्या रथाच्या मिरवणूकींचा दिंड्या व वाद्यांचा गजरात अतुल बेहरे पुणे यांच्या नांदब्रम्हे या ढोलपथकाच्या तालात आणि अमोलराजे लेझिम संघाच्या शानदार खेळाने शुभारंभ पुणेचे उद्योगपती विशाल गोखले, श्री शंकर महाराज मठ, पुणे विश्वस्त व ग्रँव्हीटी ग्रुपचे चेअरमन मिहीर कुलकर्णी, जगन्नात उर्फ अण्णा थोरात -अध्यक्ष अखिल मंडई मंडळ पुणे, बाळासाहेब दाभेकर -अध्यक्ष भरत मित्र मंडळ पुणे,भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य शहाजीराजे पवार, सो.म.पा. नगरसेवक व शिवसेना जिल्हाप्रमुख अमोलबापू शिंदे, सो.म.पा. मा.स्थायी समिती चेअरमन व शहर-जिल्हाध्यक्ष (कॉंग्रेस) चेतन नरोटे, सो.म.पा. माजी उपमहापौर दिलीप (भाऊ) कोल्हे, सो.म.पा.मा.शिक्षण सभापती संकेत पिसे यांच्या हस्ते पालखी व रथ मिरवणुकींचा शुभारंभ करण्यात येणार आहे. दि. १ जुलै ते ३ जुलैपर्यंत रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आलेले आहे.



## वेळापूर मुलींच्या शाळेत ट्रॅक्टर फेरीतून प्रवेशोत्सव साजरा

**वेळापूर** : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेळापूर मुली तालुका माळशिरस येथे इयत्ता पहिलीच्या वर्गाचा प्रवेशोत्सव सजविलेल्या ट्रॅक्टर ट्रॉली मधून रॅली काढत संपन्न झाला. प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने शाळेत बीट विस्ताराधिकारी सायरा मुलाणी, मुख्याध्यापक राजेंद्र जाधव, शाळा व्यवस्थापन समिती, पालक आणि विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत संपन्न कार्यक्रमात नवप्रवेश घेतलेल्या इयत्ता पहिलीच्या मुलींना फेटे बांधून आणि गुलाब पुष्प देऊन औक्षण करण्यात आले. तसेच मान्यवरांच्या हस्ते पाठ्यपुस्तकाचे वाटप करण्यात आले. पहिलीच्या प्रवेशासाठी सहकार्य करणाऱ्या अंगणवाडी सेविका आणि शाळेतील नूतन शिक्षक प्रवीण कुमार पांगे यांचा स्वागतपर सत्कारही संपन्न झाले. यावेळी शिक्षकांच्या वतीने प्रज्ञा इंगोले आणि अशोक पवार यांनी शाळेच्या विविध उपक्रमांची माहिती देऊन पालकांना सजग राहण्याचे आवाहन केले. तर बीट विस्ताराधिकारी सायरा मुलाणी यांनी शिक्षक आणि पालक यांच्यातील सुसंवदाचे कौतुक करून शुभेच्छा दिल्या. युवा पालक रणजीत सरवदे यांनी मुलींच्या शाळेत शिक्षक संख्या कमी असल्याने शिक्षकांच्या वर्गणीतून स्वयंसेवक नेमण्याच्या उपक्रमाचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नितीन चव्हाण यांनी केले. यावेळी पालक वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक कृष्णदेव तुपे, प्रवीण कुमार पांगे, स्वयंसेविका प्रणाली गाडवे यांचेही योगदान लाभले.

## पंचायत समिती कार्याच्या मूल्यमापनास स्वामींचे आशिर्वादही मोलाचे : खुडे

**अक्कलकोट** : महाराष्ट्र शासनाच्या यशवंत पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामीण विकास योजना अंमलबजावणी मध्ये अक्कलकोट पंचायत समिती पुणे विभागात अव्वल ठरली आहे. पंचायतराज समिती या अंतर्गत अक्कलकोट पंचायत समिती पुणे विभागात अव्वल ठरलेली आहे. या कार्यास स्वामी समर्थांचे आशीर्वाद ही तितकेच मोलाचे ठरलेले आहेत. असे प्रतिपादन येथील पंचायत समितीचे गटविकास अधिकारी सचिन खुडे यांनी केले. ते नुकतेच अक्कलकोट पंचायत समितीस अव्वल पुरस्कार लाभल्यानंतर येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन समर्थांचे आशीर्वाद घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांचे सुपुत्र प्रथमेश इंगळे यांनी गटविकास अधिकारी सचिन खुडे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन सन्मान केला. यावेळी बोलताना खुडे आपल्या भावना व्यक्त केल्या. याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, प्रसाद सोनार, गिरीश पवार, लखन गवळी, श्रीकांत मलवे, रवी मलवे इत्यादी उपस्थित होते.

## मुंडेवाडी येथे लहान मुलाच्या भांडणावरून मारहाण; तिघे जखमी

**सोलापूर** : लहान मुलास मारहाण केल्याच्या जाब विचारण्यासाठी गेल्यानंतर लोखंडी पाईप, काठी आणि लाथाबुक्याने केलेल्या मारहाणीत एका वृद्धासह तिघेजण गंभीर जखमी झाले . ही घटना मुंडेवाडी (ता. पंढरपूर ) येथे शुक्रवारी रात्रीच्या सुमारास घडली. दगडू हिरामण भोई (वय ६०) त्यांची दोन मुले मनोज भोई (वय ३०) आणि येडू भोई (वय ३५ सर्व रा.मुंडेवाडी) अशी जखमींची नावे आहेत. त्यांना पंढरपूर येथे प्राथमिक उपचार करून सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले . त्या सर्वांना काल रात्री १० वाजेच्या सुमारास बबन शंकर भोई, बाळू भोई, सचिन भोई आणि अन्य ६ जणांनी मारहाण केली . अशी प्राथमिक नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

## बोरामणी जवळ टेम्पो अडवून चालकास मारहाण

**सोलापूर** : हैदराबाद महामार्गावरील बोरामणी जवळ टेम्पो अडवून लाथाबुक्क्याने केलेल्या मारहाणीत मुदस्सर मारूफ कुरेशी (वय ४३ रा.शुक्रवार पेठ सोलापूर ) हे ड्रायव्हर जखमी झाले . ही घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली . त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले . प्रशांत परदेशी आणि इतर ५ जणांनी त्यांना मारहाण केली . अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे .

## नातेपुते गावातून जाणाऱ्या पालखी मार्गाच्या रस्त्याचे काम पूर्णत्वास

सुराज्य/नातेपुते

पालखी महामार्गावरील सर्व कामे पूर्ण करण्याचे नियोजन या विभागातील ठेकेदार जे.एम. म्हात्रे अँड कंपनी यांनी संपूर्ण काम करून रस्त्यावर पडलेले खड्डे बुजविण्यात आले आहेत. माऊलींचा पालखी मार्ग आता सुखकर झाला असून ज्या ज्या ठिकाणी खड्डे पडले होते. तो रस्ता अता खड्डेमुक्त झाला आहे.

सोलापूर जिल्ह्यात माऊली पालखी सोहळ्याचे २३जून रोजी आगमन होत असून पालखी सोहळ्याचा पहिला मुक्काम नातेपुते शहरात होत आहे. तत्पूर्वी नातेपुते शहरातील नातेपुते गावातून जाणाऱ्या पालखी मार्गावर ठिकठिकाणी



### नातेपुते,माळशिरस शहरातील

पालखी महामार्गावरील शहरातील रोडचे रुंदीकरण, दुभाजक, विद्युत खांब, दोन्हीकडून गटारींची कामे राष्ट्रीय महामार्ग खात्यामार्फत होण्याबाबत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी कडे आमदार राम सातपुते,आमदार रणजितसिंह मोहिते–पाटील यांच्यामार्फत आम्ही वेळोवेळी पाठपुरावा केला होता त्यास काही प्रमाणात यश आले आहे. **– बाबाराजे देशमुख**

(सोलापूर जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष ज्येष्ठ नेते)

पडलेले खड्डे नातेपुते नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा उत्कर्षाराणी पलंगे, उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, बांधकाम सभापती अतुल पाटील, तसेच नगरसेवक यांनी आ. रणजितसिंह मोहिते पाटील, आ. राम सातपुते यांच्याकडे केलेल्या सततच्या पाठपुराव्यामुळे काम पूर्णत्वास गेले. जुन्या मार्गानेच पंढरपूर ते आळंदी नातेपुते येथून मार्गस्त होणार आहे. त्यामुळे या मार्गाचे डांबरीकरणाचे काम नातेपुते नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा उत्कर्षाराणी पलंगे, उपनगराध्यक्ष मालोजीराजे देशमुख, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती मामासाहेब पांढरे, बांधकाम सभापती अतुल पाटील, तसेच नगरसेवक यांनी प्रयत्न करून श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा नातेपुते येथे येण्यापूर्वीच पूर्ण केला आहे.

## अभिनेत्री दिव्या पुगांवकर नव्या भूमिकेत

सुराज्य/सोलापूर

अभिनेत्री दिव्या पुगांवकर सध्या 'विठ्ठल माझा सोबती' असं म्हणत विठूरायाच्या आराधनेत रमली आहे. 'मुलगी झाली हो' मालिकेतून घराघरात पोहोचलेली माऊ' म्हणजेच अभिनेत्री दिव्या पुगांवकर नव्या भूमिकेत प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. आगामी 'विठ्ठल माझा सोबती' या चित्रपटात विठ्ठलावर निरस्सीम श्रद्धा असलेल्या एका सोज्वळ मुलीच्या भूमिकेत ती आपल्याला दिसणार आहे. फक्त मराठी आणि नाईंटी नाईन प्रोडक्शन यांच्या संयुक्त विद्यमाने 'विठ्ठल माझा सोबती' या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली असून संदीप मनोहर नवरे यांनी हा चित्रपट दिग्दर्शित केला आहे.विठ्ठल माझा सोबती' या चित्रपटाच्या निमित्ताने वारी न अनुभवता येणाऱ्या रसिकांना या चित्रपटाच्या रूपाने वारीचा सोहळा आणि लाडक्या विठूरायाच्या दर्शनाचा अनुभव घ्यायला मिळणार आहे.'आषाढी एकादशी'चं औचित्य साधून २३ जूनला प्रदर्शित होणार आहे.




## दसूर येथे विविध विकासकामांचे भूमीपूजन

सुराज्य/वेळापूर

दसुर येथे विविध विकास कामांचा ( १ कोटी १४ लाख रुपये ) भूमिपूजन व उद्घाटन समारंभ माळशिरस तालुक्याचे आमदार राम सातपुते व भाजपा संघटन सरचिटणीस धैर्यशील भैया मोहिते- पाटील यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या कार्यक्रमाला पंचायत समिती उपसभापती प्रताप पाटील , शिवामृत संचालक सचिन रणवरे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक सुधीर सुरवसे, बोंडले गावचे सरपंच विजय माने-देशमुख , बांधकाम विभाग उप अभियंता रणवरे, दसुरच्या सरपंच सौ वंदना कागदे , दसुरचे उपसरपंच तथा दसुर विकास सेवा सोसायटीचे चेअरमन धनंजय वसुदेव सावंत-पाटील व सर्व ग्रामंचायत सदस्य व दसुर गावचे ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

## म्हसवड-पंढरपूर पालखीमार्गावरील काम अपूर्णच

सुराज्य/पिलीव

माळशिरस तालुक्यातील पिलीव गाव हे सातारा - पंढरपूर महामार्गावरील मुख्य गाव आहे. या गावातुन असंख्य पालख्या ,दिंड्या, भावीक,वारकरी,चालत तसेच वाहनाने जातात .शासनाने हा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ९४८ याचे काम अनेक दिवसांपासून सुरु आहे. परंतु अनेक ठिकाणी पुलांचे ,रस्ताचे काम अद्यापही अपुर्णच आहेत.

पिलीव चौकातील रस्ताचे काम तसेच आहे तर निरा उजव्या कॅनालवरील एका बाजुचे संरक्षीत लोखंडी पाईप पुर्णपणे तुटलेले आहेत. यामुळे हा पूल अतिशय धोकादायक बनला आहे.बऱ्याच ठिकाणी रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत, रस्त्याच्या बाजुला झाडे झुडपे वाढली आहेत. तर पिलीव बसस्थानकावर सध्या व्यापारी दुकाने लावतात तसेच याठिकाणी दुचाकि वाहने अस्ताव्यस्त लावलेली असतात. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो.अर्धवट कामे ताबडतोब पूर्ण करावीत तसेच वळणावर रिफ्लेक्टर लावावेत तसेच धोक्याचे वळण ज्या ठिकाणी आहे त्या ठिकाणी वाहने सावकाश चालवा असे फलक तसेच दोन ठिकाणी शाळा आहेत त्या ठिकाणी पुढे शाळा आहे वाहने सावकाश चालवा असे सुचना फलक लावणे आवश्यक आहे.या रस्त्यावरील अडथळे दूर करण्याची मागणी वारकरी वर्गातून होत आहे.

यापुर्वी या महामार्गाचे काम रोडवेज सोल्युशन प्रा लिमिटेड या कंपनीकडे होते पण या कंपनीने वेळेत काम केले नाही तसेच अतिशय निकृष्ट दर्जाचे काम केले आहे त्यामुळे सदरचे काम दुसऱ्या कंपनीला दिले आहे पण त्यांनी अदयापही कामाला गती दिली नाही.

# लोकशाहीचा दीप सतत तेवत ठेवा : मुख्यमंत्री शिंदे

## एसओजीतर्फे आयोजित राष्ट्रीय विधायक संमेलन भारत चा समारोप समारंभ

सुराज्य/मुंबई

लोकशाहीचा दीप सतत तेवत रहावा यासाठी सर्व आमदारांनी सकारात्मक कार्य करावे. भारत देश आणि जनतेचे कल्याण हेच शेवटचे लक्ष असावे. राज्याच्या विकासासाठी ज्या पद्धतीन नवीन पॉलिसी निर्मिती करतात. त्यातूनच देशाला शक्तिशाला बनवायचे आहे'' असे विचार महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पहिल्या राष्ट्रीय विधायक परिषदेच्या समारोप समारंभ प्रसंगी व्यक्त केले.

पुणे येथील एमआयटी स्कूल ऑफ गर्व्हमेंटतर्फे आयोजित पहिल्या राष्ट्रीय विधायक संमेलन, भारत' च्या समारोप समारंभ प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

यावेळी महाराष्ट्राचे राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत, राज्यसभेचे उपसभापती हरिवंश नारायण सिंह, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, विधान परिषदेच्या उप सभापती डॉ. निलम गोर्हे, लोकसभेच्या माजी सभापती डॉ. मीरा कुमार व शिवराज पाटील चाकुरकर विशेष अतिथ म्हणून उपस्थित होते. तसेच एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड व एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंटचे संस्थापक अध्यक्ष व राष्ट्रीय विधायक संमेलनाचे प्रमुख संयोजक




समन्वयक राहुल विश्वनाथ कराड उपस्थित होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले,छत्रपती शिवाजी महाराज यांनी सर्वप्रथम लोकशाहींची कल्पना आखून अमलात आणली. त्यासाठी लोकशाहींची सुरक्षा करने ही सर्वांची जवाबदारी आहे. शासन, प्रशासन आणि न्याय व्यवस्था या लोकशाहींच्या तीन स्तंभाची सुरक्षा करावी.''

रमेश बैस म्हणाले, देशातील महत्वाचे प्रश्न आमदारांना समजण्यासाठी या व्यासपीठाने संधी उपलब्ध करून दिली आहे. लोकशाहीसाठी संसदीय समिती ही प्रभावी माध्यम आहे. आमदारांनी विधानसभेत पूर्ण वेळ देऊन सर्व समस्या समजावून घ्यावे. समाजाला प्रगतीपथावर घेऊन जाण्यासाठी आमदारांनी कार्य करावे. नव्या संसदेत तंत्रप्रणालीचा स्वीकार करावा. सर्व श्रेष्ठ अभ्यास व विकासाचे नवे मॉडेल हेच या संमेलनाचे मुख्य वैशिष्ठ आहे.

प्रमोद सावंत म्हणाले, नव्या भारतात परिवर्तन आणण्यासाठी ही परिषद अत्यंत महत्वाची आहे. संसदीय कार्यप्रणालीला उत्तम करण्यासाठी व देशाच्या विकासासाठी प्रत्येक राज्याने या पद्धतींच्या संमेलनाचे आयोजन करावे. सर्व समस्या निपक्षपणे मांडावी व त्यातूनच राष्ट्र निर्माणासाठी आमदारांनी योगदान द्यावे.प्रत्येक राज्य विकसीत होणे गरजेचे असून त्या पद्धतीने विचाराधारा विकसीत व्हावी.

हरींवंश सिंह म्हणाले, बदलत्या जगात नव्या कायद्याची गरज आहे. अशा वेळेस आमदारांनी पुढाकार घेऊन कार्य करावे. येणाऱ्या काळातील सर्व आव्हांना तोड देत डायनॅमिक बनने गरजेचे आहे. आर्थीक स्वरूपात सक्षम होऊन सामाजिकतेची गरज आहे. तसेच जुन्या कायद्यांमध्ये बदल करून नव्या कायद्याची निर्मिती करावी. सुंदर समाज निर्मितीसाठी आमदारांना विशेष प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. या सम्मेलनात देशातील विधानसभा आणि विधान परिषदेचे अध्यक्ष ,१७८० आमदार व ८० मंत्री उपस्थित होते.

राहुल कराड यांनी राष्ट्रीय विधायक परिषदेच्या तीन दिवसीय कार्यक्रमाची माहिती दिली. राहुल नार्वेकर यांनी विचार मांडले. मल्लिकाअर्जुन यांनी विडिओ संदेश दिला. डॉ. निलम गोर्हे यांनी स्वागत पर भाषण केले.प्रा. गौतम बापट यांनी सूत्रसंचालन व आभार मानले.

### गोवा येथे दुसरी राष्ट्रीय विधायक परिषद २०२४ ला

पुढील वर्षी दुसरी राष्ट्रीय विधायक परिषद गोवा येथे होणार आहे. यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या संदर्भातील राजदंड गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्याकडे सोपविला. हे संमेलन नोव्हेंबर २०२४ रोजी गोव्याला होईल. या संदर्भात स्वाक्षरी केली गेली. कर्नाटक विधानसभेचा अध्यक्ष अब्दुल खादर अली यांनी तीसरी परिषद कर्नाटक येथे होईल अशी घोषणा केली.

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, सफाई कर्मचाऱ्यांना फळ वाटप

सुराज्य/मोहोळ

माजी आमदार रमेश कदम युथ फाऊंडेशनच्या वतीने त्यांच्या सन्मानार्थ पोखरापूर येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. तसेच मोहोळ नगर परिषदेच्या सफाई कर्मचाऱ्यांना फळ वाटप करण्यात आले.

शैक्षणिक सत्राच्या शाळेच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांना माजी आमदार रमेश कदम युथ फाऊंडेशनच्या वतीने सुधीर खंदारे यांच्या माध्यमातून शालेय उपयोगी साहित्य देण्यात आले. यावेळी पोखरापूरच्या सरपंच नंदाताई लेंगरे, उपसरपंच आशिष आगलावे, संजिव खिलारे,यशवंत नरुटे,आबा कांबळे,राम कांबळे, विठ्ठल सरवदे,नागेश खिलारे, वेदांत कांबळे, सचिन भिसे, जयपाल पवार, समाधान खंदारे,सचिन भिसे,शरद खंदारे, प्रकाश खंदारे, पांडुरंग खंदारे,चेतन खंदारे, राजू भाले, महेश नेटके, मुख्याध्यापक इटेकर, शिक्षक कारंडे, शिंदे, गायकवाड आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते. मोहोळ नगर परिषदेच्या सफाई कर्मचाऱ्यांनाही फळ वाटप करण्यात आले. यावेळी आयोजक नितीन महानवर, तानाजी कसबे, बाबा आष्टुळ, आबा कांबळे, सचिन भीशे, जयपाल पवार, राजू शेख, दीपक कसबे आदी उपस्थित होते.




काय म्हणतयं? पॉलिटिक्स

# राजकीय पक्षात 'प्रभारी'च 'भारी'!

**प्रशासनात अधिकाऱ्यांची वाणवा असते, असे राजकीय पुढाऱ्यांचे मत. त्यात सत्ताधारी पक्षाच्या हातीच सर्वकाही. कुठल्या अधिकाऱ्याला कुठली, त्यांच्या व आपल्या सोयीनुसार पोस्टिंग द्यायची, हे अत्यंत चाणा क्षपण ठरवले जाते. त्यात अधिकाऱ्याचीही चांदी आणि राजकीय पुढाऱ्याचीही चांदी कशी होईल, असा 'बेत' ठरलेला असतो. अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा घोळ हा तर कायमच सुरु असतो. त्यामुळे अनेक ठिकाणी एका अधिकाऱ्याकडे चार ते पाच खात्यांचा अतिरिक्त पदभार दिला जातो. पण हे सारे काही प्रशासन पातळीवर चालू शकते. पण आता अलिककडील काळात राजकीय पक्षातील पदे आता 'प्रभारी' या बिरुदावलीखाली नेमली जात आहेत. हे जरी प्रभारी म्हणून असले तरी त्यांचा थाट मात्र तसा 'भारी' च असतो. असेच सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील प्रमुख राजकीय पक्षांमध्ये घडताना दिसून येत आहे.**

पूर्वी आणि आताही प्रमुख राजकीय पक्षात केंद्रस्तरावरच प्रत्येक राज्यासाठी प्रभारी हे पद निर्मित आहेत. ही प्रथा तशी काँग्रेसने सुरु केली. त्याचे लोन भाजपा, राष्ट्रवादी आणि इतर प्रमुख राजकीय पक्षामध्येही दिसून येत आहे. तसे नेमलेले हे प्रभारी, प्रभारी म्हणून असले तरी राज्यांतील आपल्या पक्षाची सूत्रे मात्र तेच हलवित असतात. तसा पक्षातील दुसरा कुठला त्यांच्या पदाचा राजकीय 'भार' नसतो. पण प्रभारी म्हणून त्यांना त्या त्या राज्यात वेगळाच मान आणि वजन.

आता सोलापूरच्या बाबतीत, शहर काँग्रेसचा विषय घेतला तर शहराचे अध्यक्ष चेतन नरोटे हे सध्या प्रभारी म्हणूनच पक्षाचा गाडा हाकीत आहेत. पूर्वीचे शहराध्यक्ष प्रकाश वाले यांना तडकाफडकी काढून त्यांच्या जागी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांनी नरोटेंना खास मुंबईत बोलावून प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देऊन प्रभारी शहराध्यक्ष दिले. नरोटेनेही प्रभारी का असेना, म्हणत या पदावर चांगला न्याय देण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. राजकीय वा सामाजिक विषय असो, त्यांनी आंदोलने करुन पक्षातील कार्यकर्त्यांना जवळ केले आहे. पण काँग्रेसमधील या सगळ्या गोंधळात चेतन नरोटे, हे किमान पाच वर्षे तरी कायमस्वरुपी अध्यक्षपदाची वाट पहात आहेत.

काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष धैर्यशील मोहिते-पाटील यांची नियुक्ती झाल्यानंतर तो थोडेदिवस सक्रिय राहिले. पण पक्षकार्यात अजूनही त्यांनी म्हणावे, तितके वाहून घेतले नाही. मध्यंतरी तालुकाध्यक्षांच्या निवडीचा घोळ झाला. तो तसा अजून शांत झाला नाही. त्यातच जिल्हा कार्याध्यक्ष सुरेश हसापुरे यांनी जिल्हा काँग्रेसची सारी सूत्रे विजयकुमार हत्तुरे यांना हाताशी धरुन सुरु केला आहे. त्यामुळे जिल्हा काँग्रेसमध्ये आजही धूसफूस कायम आहे.

आता, हा घ्या सोलापूर शहर राष्ट्रवादी काँग्रेस. पक्षात बाहेरुन आलेल्यांना मान-समान्य आणि अधिकार दिले जात असल्याने शहराध्यक्ष भारत जाधव यांनी स्वत:हून अध्यक्षपदाचा राजीनामा दिला. आता या पदावर सुधीर खरटमल, ॲड. यु. एन. बेरिया, बिज्जू प्रधाने यांनी मोर्चेबांधणी सुरु केली




शंकर जाधव, कार्यकारी संपादक
मो. ९५१८७७३०४८

आहे. दरम्यान जाधव यांनी राजीनामा दिला असला तरी ते पुन्हा शहराध्यक्षपदाच्या रेसमध्ये उतरले आहेत. त्यांना तूर्त 'प्रभारी' म्हणून रहा, असा संदेश प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी दिला आहे. त्यामुळे राजीनामा देऊन आपणच आहोत, असा थाट भारत जाधव यांचा आहे. तसं सुरुवातीपासूनच शहर राष्ट्रवादी काँग्रेस नेते जास्त आणि कार्यकर्ते कमी तसेच गटातटाच्या राजकारणात अकलेली आहे. त्यात इतर पक्षातून नव्याने दिग्गज नेते राष्ट्रवादीमध्ये आले आहेत. त्यांना वरिष्ठ नेत्यांनी मान-सन्मान आणि इतर अधिकार दिल्याने जुन्या-जाणते नेते सध्यातरी पक्ष कार्यापासून दूरच आहेत.



शहर भाजपामध्येही तशीच अवस्था आहे. शहराध्यक्ष विक्रम देशमुख यांची मुदत मार्चमध्येची संपली आहे. त्यांना तूर्त पक्ष सांभाळा असा, आदेश मिळाला आहे. दरम्यान त्यांची सोलापूर लोकसभा निवडणूक प्रमुखपदाची जबाबदारी दिली आहे. देशमुख यांची मुदतही संपली आणि नवी जबाबदारीही आली.

यामुळे शहराध्यक्षपदासाठी इच्छुक असलेल्यांमध्ये लॉम्बिंग तर सुरु झाले आहेत पण त्यांच्यात चांगला 'चेव' ही सुटला आहे. भाजपामध्ये शहराध्यपदासाठी पाडुरंग दिड्डी, अनंत जाधव, नरेंद्र काळे, राजकुमार पाटील, चन्नवीर चिट्ठे, अप्पासाहेब चौगुले, हेंमत पिंगळे ही मंडळी लाईन लावून उभी आहेत. यातील दिड्डी, जाधव, काळे, पाटील हे चौघे मुंबई जाऊन प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भेटली खरी. त्यांच्या भेटीचं मुख्य कारण होतं आ. विजकुमार देशमुख यांच्या मंत्रीपदाचं, पण त्यांनी आमच्या चौघांपैकी कुणालाही भाजपा शहराध्यक्षपद द्या, असा टाहो फोडला. बघूया, शहराध्यक्षपदाबाबत भाजपात कलाटणी मिळते की पुन्हा 'विक्रम' च.

तसं शिवसेनेतील शिंदे गटाची सूत्रे अमोल शिंदे, मनिष काळजे, मनोज शेजवाल हेच हलवित आहेत. सत्ता असल्याने त्यांची हक्काने आणि 'चॅलेंज' देतच कामे सुरु आहेत. दुसरीकडे ठाकरे गटात शहर प्रमुख म्हणून विष्णु कारमपुरी काम पहात आहेत. मात्र पद्मशाली चौकापलिकडे ते येत नाहीत. त्यामुळे मर्जीप्रमाणे पुरुषोत्तम बरडे आणि गणेश वानकर ही मंडळी शहर आणि जिल्हा ठाकरे गटाच्या सेनेचा बिनबोभाट गाडा हाकीत आहेत.

... पण राहता राहिला तो 'प्रभारी'चा. या शब्दाला इतके महत्व आले आहे की, प्रभारी म्हणजेच 'भारी' त्यामुळे हा शब्द आमच्या नावापुढून काढू नका, अशी म्हणण्याची पाळी येऊ नये, म्हणजे झाले. त्यात आता निवडणुकांचा माहोल सुरु होत असल्याने किमान जुलैमध्ये राजकीय पक्षात अनेकांना 'धक्के' बसणार, एवढे मात्र निश्चित.

# बारबोले पिता, पुत्रांच्या रूपाने राष्ट्रवादीला लाभला चेहरा

सचिन अपसिंगकर

**दोन वर्षापुर्वी झालेल्या वैराग नगरपंचायत निवडणुकीमध्ये माजी मंत्री सोपल, आमदार राऊत यांच्या गटांचे आव्हान समोर असतानाही राष्ट्रवादीच्या माध्यमातून निरंजन भूमकर यांनी बाजी मारली. तत्पूर्वी गेली बारा वर्षे विद्यमान आमदार राजेंद्र राऊत यांचे सहकारी म्हणून वावरलेल्या माजी नगराध्यक्ष विश्वास बारबोले व त्यांचे पुत्र आणि उपनगराध्यक्ष कृष्णराज बारबोले यांनी राष्ट्रवादीचे घड्याळ हाती बांधले. या बारबोले पिता, पुत्रांच्या रूपाने राष्ट्रवादीला चेहरा लाभला आहे.**



बार्शी तालुक्यात सोपल, राऊत, मिरगणे, आंधळकर हे नेते राजकारणात सक्रिय आहेत. विद्यमान आमदार राऊत यांनी २०१९ साली विधानसभेची निवडणूक जिंकुण आमदार झाल्यानंतर आजतागायत उघडपणे भारतीय जनता पार्टीची पाठराखण केली आहे. माजी मंत्री सोपल हे आज तरी उध्दव ठाकरे यांच्या गटात आहेत. ते सध्या वेट ॲण्ड वॉचच्या भूमिकेत आहेत. महाहौसिंगचे माजी सहअध्यक्ष राजेंद्र मिरगणे हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निकटवर्तीय मानले जातात. मात्र ते सध्या राजकीय अलिप्तता वादाच्या दृष्टीने वाटचाल करत आहेत. आंधळकर हे ठाकरे यांच्या शिवसेनेत गेली दहा वर्षे निष्ठावंताची भूमिका पार पाडत भगवा खांद्यावर घेत कार्यरत होते. मात्र शिवसेनेने न्याय दिला नाही असे म्हणत त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्व स्विकारत शिंदे गटात प्रवेश केला आहे.

बाशीमध्ये सर्व निवडणूकांमध्ये स्थानिक आघाड्यांचे राजकारण असते. मात्र सध्या राज्याच्या राजकारणात महाविकास आघाडी विरूध्द भाजपा असा सामना रंगला आहे. अतिशय चुरशीने पक्षीय राजकारण लढले जात आहे. वैरागमध्ये झालेल्या नगरपंचायत निवडणुकीमध्येही पक्षीय चिन्हांवरच निवडणूका लढविल्या गेल्या होत्या. बार्शी तालुक्यात प्रस्तावित निवडणूकांमध्येही पक्षीय बलाबल जोखले जाण्याचीच शक्यता जास्त आहे. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार होते. मुख्यमंत्रीपद जरी शिवसेनेकडे असले तरी सत्तेवर राष्ट्रवादीची पकड होती. त्यामुळे बार्शी तालुक्याच्या राजकारणात निर्माण झालेली राजकीय अवस्था लक्षात घेत बारबोले पिता, पुत्रांनी पवित्रा घेतला. बारबोले पिता, पुत्रांना राष्ट्रवादीतुन स्वबळावर निवडणुका लढण्यापेक्षा महाविकास आघाडीचाच पर्याय जास्त हिताचा आहे असे त्यांच्या समर्थकांचे मत आहे. मात्र बारबोले पिता, पुत्रांना अस्तित्वासाठी लढावे लागणार असून त्यांना तारेवरची कसरतच करावी लागणार आहे. मनगटशाही आणि धनशक्तीचा प्रभाव असलेल्या बार्शी तालुक्यातील निवडणूकांमध्ये सर्वस्व पणाला लावूनच उतरावे लागते. अशा या रणांगणामध्ये बारबोले पिता, पुत्र नेमकी कोणती व्यूहरचना आखतात आणि त्यांच्या रणनितीला यश लागते का ? याची बार्शीकरांना उत्सुकता आहे.

# निंबाळकरांची निवडणुकीसाठी मोर्चेबांधणी सुरु

## जानकरांना गळ टाकण्याचा प्रयत्न

संजय पाटील

**सोलापूर जिल्हयाचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे-पाटील हे पालखी नियोजनाच्या बैठकीनिमित्त माळशिरस तालुक्यात आले होते. यादरम्यान त्यांनी वेळापूर येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते उत्तमराव जानकर यांची त्यांच्या गरुड बंगल्यावर जाऊन भेट घेतली. या भेटीमुळे तालुक्यात चर्चेला ऊत आला आहे. विद्यमान खासदार निंबाळकर ही भेट घडवून आण्यात पुढे होते. खा. निंबाळकर हे उत्तमराव जानकर यांच्या भाजपा प्रवेशासाठी प्रयत्नशील असल्याचे बोलले जात आहे.**

पालकमंत्री विखे-पाटील हे भाजपा कार्यकर्त्यांना वेळ दिला नाही पण राष्ट्रवादी काँग्रेसचे उत्तमराव जानकर यांचा चहा त्यांना गोड लागला, अशी चर्चा सध्या ऐकवयास मिळत आहे. उत्तमराव जानकर हे गत लोकसभा निवडणुकीत भाजपमध्ये होते, त्यामुळे भाजपला त्यांचाही फायदा झाला आहे. सध्या खासदार रणजितसिंह निंबाळकर पुन्हा एकदा निवडणुकीची तयारी करत आहेत. त्यामुळे खासदारांची सध्या आपल्या इतर पक्षातील नेत्यांची जुळवाजुळव सुरु आहे. त्यांची उत्तमराव जानकर, आ. शहाजीबापू पाटील, संजयमामा शिंदे, माजी आ. प्रशांतराव परिचारक, जयकुमार गोरे यांची राजकारणापलीकडील मैत्री सर्वश्रुत आहे. या सर्वांची मोट बांधून निवडणुकीला सामोरे जाण्याचा निंबाळकरांचा प्रयत्न आहे.



### ताळमेळ राखणे भाजपला शक्य होईल का ?

खासदार रणजितसिंह निंबाळकर आणि मोहिते-पाटील यांच्यातील कटुता संपवून उत्तमराव जानकर यांना भाजपमध्ये आणून संधी देणे तसेच विद्यमान आ. रामभाऊ सातपुते यांची मतदारसंघात वाढलेली लोकप्रियता या सगळ्यांचा ताळमेळ लावणे भाजपला शक्य होणार का नाही, हे काळच ठरवेल.

### जानकारांचे पुनर्वसन करावे लागणार

उत्तमराव जानकर यांना भाजपमध्ये आणून आगामी लोकसभा निवडणुकीसाठी आपली बाजू भक्कम करण्याकडे खासदारांचा कल दिसत आहे. पण यासाठी उत्तमराव जानकर यांना भाजपने विधानसभेला तिकीट देणे किंवा विधानपरिषेदेवर आमदार म्हणून घेतल्याशिवाय त्यांचा भाजप प्रवेश होईल असे वाटत नाही.

# 'चिमणी 'मुळे कोणाची 'देशमुखी 'अडचणीत येणार?

दीपक शेळके

**अनेक वर्षापासून राजकारणाचा विषय ठरलेली सिध्देश्वर कारखान्याची चिमणी शांत झाली. मात्र या चिमणीची धग कायम राहणार आहे. चिमणी पाडकामाचे राजकीय आणि समाजिक परिणाम आगामी लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत दिसण्याची शक्यता नाकारता येत नाही. सोलापूर लोकसभासह शहर उत्तर विधानसभा, दक्षिण विधानसभा आणि अक्कलकोट विधानसभा मतदार संघावर चिमणी पाडकामचे पडसाद उमटून येथल राजकीय 'देशमुखी' अडचणीत येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.**



चिमणी पाडल्यामुळे कारखान्याचे सभासद, ऊस उत्पादक तसेच कामगार कर्मचारी वर्गामध्ये तीव्र नाराजी आहे. चिमणी पाडण्यामागे भाजप असल्याचा आरोप कारखान्याचे मार्गदर्शक धर्मराज काडादी यांनी केला आहे. त्यांचा रोख भाजपाचे खासदार, आमदारांवर आहे. शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख यांना पहिल्यापासून टार्गेट केले जात आहे. त्यामुळे काडादी यांना भाजप वगळता काँग्रेस, राष्ट्रवादी, माकपा, शिवसेना यांची सहनुभुती मिळत आहे.

सर्व राजकीय पक्ष काडादींना सहानुभूतीचे पाठबळ देऊन भाजपला टार्गेट करत सोलापूरातील दोन्ही देशमुखांना अडचणीत आणण्याची व्युव्हरचना आतापासून आखली जात आहे. त्यामध्ये महाविकास अघाडीतील घटक पक्ष आघाडीवर आहेत. कारखान्यावर झालेल्या कारवाईमुळे विरोधकांना पाठबळ मिळाले आहे.

वास्तविक पाहता कारखान्याचे कार्यक्षेत्र दक्षिण सोलापूर, उत्तर सोलापूर तसेच अक्कलकोट भागात आहे. या मतदारसंघात मोठ्या प्रमाणात शेतकरी सभासद आहेत. या लोकांचे कारखान्याशी एक भावनिक नाते जोडले गेले आहे. चिमणी पाडल्यानंतर यांच्या भावना आता तीव्र झाल्या आहेत. निवडणुकीच्या वेळी मतदानाच्या माध्यमातून हा रोष बाहेर येण्याची शक्यता आहे. यांचे थेट परिणाम सोलापूर लोकसभासह शहर उत्तर आणि दक्षिण सोलापूर आणि काही प्रमाणात अक्कलकोट विधानसभा मतदार संघावर पडणार असल्याचा दावा जाणकार करत आहे.

यासाठी काडादी यांना मैदानात उतरावे लागणार आहे. काडादी शहरातील मोठे घराणे आहे. या घराण्याला मान आहे. अनेक शिक्षण संस्था सामाजिक संस्था सहकारी चळवळीच्या माध्यमातूनही घराणे अग्रेसर आहे. मात्र आता गलिच्छ राजकारणाचा बळी ठरल्याचा आरोप करत धर्मराज काडादी यांनी चिमणी पाडण्यामागे असलेल्या झारीतील शुक्राचार्यांना केंव्हाच उघड केले आहे. हे कटकारस्थान करणाऱ्यांच्या विरोधात थेट मैदानात उतरण्याची भाषा काडादी यांनी केली आहे. मात्र शहर उत्तर किंवा दक्षिण विधानसभा पैकी कोणत्या मतदारसंघावर स्वार होणार ? की चिमणी पाडण्याचे षडयंत्र करणाऱ्यांच्या विरोधात शेतकऱ्याची आणि सभासदांची फौज उभी करणार? हे उघड केले नाही.

काडादीचा नेमका रोष कोणावर आहे. हे उघड झाले आहे. मात्र आपली नेमकी भूमिका काय हे स्पष्ट केली नाही. त्यामुळे निवडणुकांना असणारा कालावधी लक्षात घेता या विषयाची तीव्रता किती कायम राहते? हे देखील पहावे लागणार आहे.

महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत चिमणीच्या पाडकामाचा ठराव आणण्यासाठी कोणत्या पक्षाच्या आमदारांनी मदत केली. तो ठराव मंजूर व्हावा म्हणून भाजपाच्या सर्वच नगरसेवकांना व्हीप कोणाच्या सांगण्यावरून बजावला. या उत्तराचा शोध घेतला असता एकाच लोकप्रतिनिधीचे एकाच पक्षाचे नाव पुढे येते. त्यामुळे कारखान्याच्या सभासदांची व्याप्ती पाहता त्यामुळे शहर उत्तर आणि दक्षिण विधानसभा मतदारसंघ हे दोन टार्गेट असल्याने या दोन्ही मतदारसंघातील 'देशमुखी' अडचणीत आली आहे.

# कुर्डुवाडी शहरात राजकीय इच्छाशक्तीची गरज

उल्हास पाटील

**दि. १ एप्रिल १९५४ रोजी स्थापन झालेल्या कुर्डुवाडी नगरपालिकेचा विकास, पर्याप्त दळणवळण सुविधा, मुबलक पाणी असताना अपेक्षित गतीने झाला नाही. १९९० नंतर येणाऱ्या प्रत्येक सत्ताधाऱ्यांनी शहराच्या विकासासाठी शहराची हद्दवाढ हा एकमेव पर्याय असताना राजकीय इच्छाशक्ती व प्रशासकीय अनास्था यामुळे शहरालगत असलेल्या विस्तारित भागात हद्दवाढ झालेली नाही.**

नगरपरिषदेच्या ६७ वर्षांच्या काळात ४१ नगराध्यक्ष होऊन गेले ४२ व्या नगराध्यक्षाचा कालखंड येणाऱ्या पाच महिन्यात संपणार आहे. गेल्या ३० वर्षांच्या कालखंडात माढा तालुक्यात शिवसेनेला फारसे यश आले नसले तरी नगरपरिषदेत एक अपवाद वगळता नगरपरिषदेत शिवसेनेची सत्ता राहिली आहे. परंतु रस्ते ,गटारी आणि पाणी याशिवाय शहराच्या विकासात भर टाकणारा एकही प्रकल्प शहरात आला नाही.




### निवडणुकीपूर्वी हद्दवाढ होईल का?

गेली २५ वर्ष नपा सत्तेत असलेल्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख पदाचा मान गेली अनेक वर्षे कुर्डुवाडीकडेच आहे. करमाळ्याचे शिवसेनेचे माजी आमदार नारायण पाटील व नगरविकास मंत्री एकनाथ शिंदे सख्य सर्वश्रुत आहे. यामुळे येणाऱ्या न.पा. निवडणुकीपूर्वी आपले वजन वापरून हद्दवाढ करून घेतल्यास १७ वॉर्ड वाढून २१ होतील व शहराच्या विकासात भर पडेल. मात्र यासाठी गरज आहे ती राजकीय इच्छाशक्तीची.

कुर्डुवाडी एमआयडीसी १९९४ साली मजुरी मिळून स्थापना झाली मात्र गेल्या २६ वर्षांच्या काळात पाणी उपलब्ध झाल्यापासून स्थानिक नेतृत्वाकडून उद्योग आणण्यासाठी एकही प्रयत्न झाला नाही.

उच्च न्यायालयाने दोन बेंचसाठी मंजुरी दिल्यानंतर झालेल्या जागेच्या मागणीला जागा उपलब्ध नसल्याचे उत्तर नगरपरिषदेच्या वतीने देण्यात आले.अतिरिक्त तहसील कार्यालयाची चर्चा ही चर्चाच राहिली गटारी, रस्ते ,पाणी या मूलभूत गरजेपूरता शहराचा विकास मर्यादित राहिला.

सध्या शहराची लोकसंख्या २२ हजार ७७३ इतकी आहे.९१७ मालमत्ता गेली २६ वर्ष सरकारी फायलींच्या प्रवासात अडकल्याने गावठाणाऐवजी शहर जवळच्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत विस्तारले कुर्डु व भोसरे या ग्रामपंचायतीच्या विस्तारित भागात सर्व सुविधा शहरातून दिल्या जातात. यामुळे भागाची लोकसंख्या मिळाल्यास शहराची लोकसंख्या ३० हजाराच्या पुढे जाऊन शहराला ब वर्ग नगपरिषदेचा दर्जा प्राप्त होईल व विकासासाठीचा वाढीव निधी मिळेल.